संत झेवियर्स महाविद्यालय, मुंबई


# मराठी वाङ्मय मंडळ


# पखरण


मुख्य सचिव
ओंकार अगुरेड्डी


मुख्य-समन्वयक व्यवस्थापन
अद्वैत जोशी


उप-सचिव व्यवस्थापन
अथर्व निकम


उप-सचिव
प्रचिती म्हात्रे


मुख्य समन्वयक
अनिकेत गवस


संपादिका
मृण्मयी पाथरे


खजिनदार
शांभवी मोरे



साहित्य विभाग
कश्मिरा सावंत


संगीत विभाग
कनकांगी भाभे


नाट्य विभाग
श्रीराज जाधव


नृत्य विभाग
यशश्री नायकरे


कला विभाग
दर्शना देटके


लॉजिस्टीक्स विभाग
जेम्स गोन्सालवीस


जन-संपर्क विभाग
सानिका गोरुले


जन-संपर्क विभाग
ईश्वरी खातू


मार्केटिंग विभाग
भव्या जैन


मार्केटिंग विभाग
डिलायका रॉडिक्स


डिजीटल सजावट विभाग
जेसन कुटिन्हो


छायाचित्रण विभाग
शार्दुल भोगले


सि.एल.
जय मेंडोंसा

# पखरण

मुख्य सचिव : ओंकार अगूरेड्डी

संपादिका : मृण्मयी पाथरे

मुखपृष्ठ व अक्षर जुळवणी : अथर्व निकम

# अंतरंग


1) संपादकीय
2) मुख्य सचिवाच्या लेखणीतून
3) देहू-आळंदी
4) झेविअर्स, मराठी वाङ्मय मंडळ आणि बरंच काही
5) एकल पालकत्विक कुटुंबातील जडणघडण
6) स्त्री
7) भूतकाळाचं भूत
8) बाप्पाच्या आठवणी
9) चाहूल की अंत?
10) श्रमसंस्कारांची शिदोरी
11) मराठी कादंबरी आणि आधुनिकता
12) सिंड्रेलाचा बुट
13) लिफाफा
14) ऐकलंस का रे कृष्णा?
15) मित्रा
16) अविस्मरणीय भेट
17) दयामरण
18) प्राचार्य ॲगींशी गप्पाटप्पा
19) झेविअर्सपलीकडचं जग
20) जीवनचित्र
21) बाबा
22) आभाळ आमचा संसार
23) जीवनमंत्र

# संपादकीय

## मृण्मयी पाथरे

द्वितिय वर्ष, कला शाखा (संपादिका)

**न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये |**
**भावे हि विद्यते देवस्तस्मात् भावो हि कारणम् ||**

अर्थात,

खरे पाहता देव लाकडाच्या, दगडाच्या किंवा मातीच्या मूर्तीत नसतो, तर तो मनुष्याच्या भक्तिभावात दडलेला असतो. येथे भक्तीभाव हा केवळ देवाच्या उपासनेपुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या विविध भावरंगांशी निगडित आहे. या भावभावनांची पण एक गंमत आहे नाही? कधी कधी हे नवरस आपल्या मनात इतका धुमाकूळ घालतात की विचारता सोय नसते, पण त्या अचूक शब्दांत मांडणं फारच अवघड भासतं. आणि इथंच सच्च्या लेखकाचं खरं कौशल्य पणाला लागतं.

साहित्याची निर्मिती करणं हे काही सोपं काम नव्हे. जसं डाळीला झणझणीत तडका दिल्याशिवाय खवय्याची जीभ संतुष्ट होत नाही, तसंच डोक्यातले विचार आणि मनातल्या भावना कागदावर नेमकेपणाने उतरवल्याशिवाय सच्च्या लेखकांना समाधान मिळत नाही. साहित्यनिर्मिती ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. म्हणूनच पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा असणाऱ्या झेविअर्समध्ये मराठीत लेखन करणाऱ्यांसाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध व्हावं याकरिता मराठी वाङ्मय मंडळाने 'तेजोमय' हा दिवाळी अंक आणि 'पखरण' हा वार्षिक अंक प्रकाशित करायला सुरुवात केली. अभ्यासेतर विषयांवर विद्यार्थ्यांना आपली मतं मांडता यावीत हा त्यामागचा हेतू! यंदाच्या 'तेजोमय'च्या 'व्यक्ती आणि वल्ली' या थीमला उदंड प्रतिसाद मिळाला. या वर्षीच्या 'पखरण'चं वैशिष्ट्य म्हणजे अनेक मराठीभाषिक आजी-माजी विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसंच अमराठी विद्यार्थ्यांनी सळसळत्या उत्साहाने लेख, कविता आदी लिहून 'पखरण'ची शोभा वाढविली आहे.

'पखरण'चं संपादन करताना नेहमीच सहकार्य करणारी मराठी वाङ्मय मंडळाची समस्त कार्यकारिणी, मंडळाला सदैव प्रोत्साहन देणारे आपले प्राचार्य डॉ. अॅग्नेलो मिनेझिस आणि मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र शिंदे यांचे आम्ही आभारी आहोत. संपादनात मोलाचे मार्गदर्शन करणारे लोकसत्ताचे सहसंपादक रवींद्र पाथरे आणि मराठी वाङ्मय मंडळाचा माजी संपादक हर्षद पारेकर यांचेही आम्ही शतशः ऋणी आहोत. तसेच आमचे सर्व लेखक, वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांचेही मनःपूर्वक आभार.

‘पखरण’चा हा अंक तुम्हाला विचारमंथन करायला प्रोत्साहित करेल आणि तुमच्या आयुष्यात आनंदाची पखरण करेल अशी आशा करते. आपल्या प्रतिक्रियांचे सहर्ष स्वागत आहे. त्या आम्हाला mvm.pakhran2018@gmail.com या ईमेल आयडीवर नक्की कळवा!

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# मुख्य सचिवाच्या लेखणीतून...


## ओमकार अगुरेड्डी

**तृतीय वर्ष, बी. वॉक. पर्यटन विभाग**


मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील सर्वात जुने वाङ्मय मंडळ अशी ख्याती असलेल्या आपल्या संत झेविअर्स महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाने यंदा ९४ व्या वर्षात पदार्पण केलं आहे. या मंडळाची स्थापना १९२३ साली झाली आणि तेव्हापासून आतापर्यंत मंडळाने अनेक मराठी तसंच अमराठी विद्यार्थ्यांना आपल्या परिवारात सामावून घेतलं आहे. गेली ९४ वर्षं मराठी वाङ्मय मंडळ आपल्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न करत आहे. आमच्या या मराठी वाङ्मय मंडळाची ओढच इतकी न्यारी आहे, एकदा का मंडळात सामील झालात की इथल्या आपुलकीच्या वातावरणाने तुम्ही कायमस्वरूपी या कुटुंबाचा भाग होऊन जाता.

पाश्चिमात्त्य संस्कृतीचा पगडा असणाऱ्या झेविअर्समध्ये मराठी संस्कृतीची ज्योत अखंड तेवत ठेवण्याचं काम हे आमचं मंडळ करत असतं. महाविद्यालयातील मराठीभाषिक युवकांमध्ये मराठी भाषेची गोडी वाढावी, तसंच अमराठी युवकांना महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीची, परंपरांची ओळख व्हावी यासाठी आम्ही नेहमीच कार्यरत असतो. ज्यावेळी मराठी वाङ्मय मंडळाच्या मुख्य सचिवपदी माझी निवड झाली, तेव्हाच संपूर्ण कॉलेजमध्ये मराठी संस्कृतीचा प्रसार करायचा हे ध्येय डोळ्यांसमोर लख्ख दिसत होतं. आणि हे कार्य तडीस नेण्यासाठी मंडळाचे मावळे माझं बळ क्षणोक्षणी वाढवत होते. माझा जन्म पुण्याचा. विद्येचं माहेरघर असलेलं आणि मराठीचा अतोनात अभिमान बाळगणारं हे शहर! पण झेविअर्समध्ये आल्यावर कोणीच मराठी बोलत नाही हे पाहून जीवाला फार बोचलं. तेव्हाच मनाशी निर्धार केला की मराठीची धगधगणारी आग मशालीत परावर्तित करायची. आणि आम्हा मावळयांचा इतिहास घडवण्याचा प्रवास सुरू झाला...

या वर्षाच्या कार्यक्रमांचा प्रारंभ गुरूपौर्णिमेला शिक्षकांना भेटवस्तू देऊन झाला. 'नभ उतरू आलं' या शुभारंभाच्या कार्यक्रमापासून अभिनय कार्यशाळा, क्रोशे कार्यशाळा ते संगीत विभागाच्या 'सूरसंगिनी' या जॅम सेशनपर्यंत अनेक उपक्रमांमधून मराठी वाङ्मय मंडळाने विद्यार्थ्यांना आपल्यातील हुन्नर जगासमोर मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली. मंडळाच्या 'तेजोमय' या दिवाळी अंकाचं प्रकाशन १३ नोव्हेंबर २०१७ रोजी झालं. 'आमोद' हा मंडळाचा वार्षिक सोहळा असून यात झेविअर्ससह इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना आपल्या विविध कलागुणांच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ मिळतं. यंदा १६, १७, १८ जानेवारी रोजी हा सोहळा

संपन्न झाला. ‘पखरण’ हा आमचा वार्षिक अंक म्हणजे आम्हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय! झेविअर्सशी निगडित व्यक्तींना अभ्यासेतर विषयांवर लिहितं करण्याचं मोलाचं काम ‘पखरण’ करतं. यंदाही ‘पखरण’मध्ये असणारी साहित्याची मेजवानी तुम्हाला तृप्त करेल अशी आशा करतो.

अशा या मराठी वाङ्मय मंडळाच्या ९४ वर्षांच्या समृद्ध परंपरेचा मीही एक भाग आहे, हे मी माझं भाग्य समजतो. आजच्या तरुणाईत आपली मराठी संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार हातभार लावू शकलो याचा मला सार्थ अभिमान आहे. मंडळाच्या प्रगतीसाठी आमची सर्व कार्यकारिणी वर्षभर खूप मेहनत घेत असते आणि या कामातून आम्हाला केवळ समाधानच नाही, तर आयुष्यातील वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये येणाऱ्या समस्यांचा सामना करण्याची रंगीत तालीमही मिळत असते.

असं हे आपलं मराठी वाङ्मय मंडळ उत्तरोत्तर प्रगती करो, हीच माझी सदिच्छा

# देहू-आळंदी

## महादेव सोनुले

**शिक्षकेतर कर्मचारी (मुख्य कार्यालय)**

गोड नाम तुकाचे घेऊ
त्याचे गाव तीर्थक्षेत्र देहू
ज्ञानेश्वर मुक्ताईचा भाऊ
समाधी क्षेत्र आळंदी पाहू

गोरा कुंभाराची भक्ती पाहू
बहिणाबाईची गाणी गाऊ
गंगामाई हो इंद्रायणी न्हाऊ
स्नान करूनी पवित्र होऊ

कपाळी गंध-बुका लावू
तुकारामाची गाथा गाऊ
विठ्ठलचरणी माथा ठेवू
भाग्यवंत ती विट हो पाहू

ज्ञानेश्वरांची भिंत पाहू
वरती बसले बहीण-भाऊ
तुकोबांचा तो वाडा पाहू
संत आत्मा अवतरला देहू

# झेविअर्स, मराठी वाङ्मय मंडळ आणि बरंच काही...

**चेतन देऊळकर**

**लॉजिस्टिक्स आणि टेक्निकल विभागप्रमुख (२०१६-१७)**

**नमस्कार मंडळी!**

खरं तर दहावी झाली की सगळयांच्या मनात प्रश्न असतो- आता पुढे काय? शैक्षणिक शाखा, उत्तम महाविद्यालयांबद्दलची चौकशी, पहिली मेरिट लिस्ट अशा बऱ्याच गोष्टी आपल्या मनात धुमाकूळ घालत असतात. पण हे सगळं चालू असतानाच माझं नाव झेविअर्स च्या यादीमध्ये आलं आणि तेव्हा झालेला पराकोटीचा आनंद मी शब्दात मांडू शकत नाही. तब्बल १४४ वर्षांचा वारसा लाभलेल्या या महाविद्यालयात पहिलं पाऊल टाकलं तेव्हा आपण कुठल्यातरी ऐतिहासिक ठिकाणी आल्यासारखं वाटलं. नवीन कॉलेज, नवी मित्रमंडळी आणि नवे विषय याबद्दलची उत्सुकता मनामध्ये आधीपासूनच होती. सुरुवातीला मुंबईच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लांब प्रवास करून मला फार दमायला व्हायचं. कित्येकदा झेविअर्सच्या भल्यामोठ्या इमारतींमध्ये मी हरवूनही जात असे.

इमारतींमध्ये मी हरवूनही जात असे. पण जसजसे दिवस निघून गेले तसतसं कॉलेजनं मला आपलसं केलं. पुढे मला कॉलेजशिवाय एक दिवसही करमत नव्हतं इतकी ओढ निर्माण झाली होती. एकदा मी आजारी असताना मला अनेकांनी- अगदी शिक्षकांनीसुद्धा मनापासून सहकार्य केलं. मी आजही त्यांचा ऋणी आहे.

एके दिवशी कॉलेजमध्ये सहज फेरफटका मारत असताना मला हिंदी साहित्य कला अकादमी असं लिहिलेला एक काचफलक दिसला आणि त्याच्या बाजूलाच मराठी वाङ्मय मंडळ असं मोठ्या दिमाखदार शब्दांत लिहिलं होतं! मी पटकन् संपर्क साधून मंडळाचा सदस्य झालो. मुळात झेविअर्ससारख्या इंग्रजाळलेल्या कॉलेजमध्ये एक मराठी संस्था कार्यरत आहे आणि तीही तब्बल ९० वर्षे जुनी- हे कळल्याने मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. हळूहळू मी मंडळाच्या कामात सक्रिय झालो. लवकरच मला मुक्तछंद, आमोद, पखरण या सर्वांची ओळख झाली. लवकरच स्वखर्चाने सुरुवात केलेल्या मंडळाच्या पहिल्यावहिल्या दिवाळी अंकाचं-तेजोमयचं प्रकाशन झालं. २८ फेब्रुवारी २०१३ रोजी आमोद या वार्षिक महोत्सवाची सुरुवातही अत्यंत उत्साहाने झाली. मंडळाची कार्यकारिणी आणि सदस्य असे मिळून आम्ही केवळ २० ते २५ जणच होतो. परंतु असं असलं तरी सर्वांनी मनापासून काम केलं. आपलं मंडळ इतरांच्या तुलनेत कुठे कमी तर पडणार नाही याची योग्य ती खबरदारी सर्वजण घेत होते. असं करत करत आमचा पहिलावहिला 'आमोद' यशस्वी झाला. त्याचवेळी आमचा वार्षिक

अंक- पखरण देखील अभिनेते सुबोध भावे यांच्या हस्ते प्रकाशित झाला. आणि तेव्हाच आम्ही ठरवलं, की या पुढे मंडळाचे सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पाडायचे आणि अधिकाधिक दर्जेदार करायचे.

या आगळयावेगळया कार्यकारिणीचा भाग व्हावं ही मनातली इच्छा दिवसागणिक बळावत गेली. २०१६-१७ साली मी लॉजिस्टिक्स आणि टेक्निकल या विभागाचा विभागप्रमुख झालो. सभासदांची नोंदणी झाल्यावर लवकरच मी माझ्या लॉजिस्टिक्स डिपार्टमेंटची पहिली मीटिंग कॉलेजच्या बास्केटबॉल कोर्टमध्ये ठेवली. माझ्या अपेक्षेनुसार फक्त २०-३० जण जमले असावेत असं मला वाटलं. आणि पाहिलं तर काय! चक्क अख्खा फर्स्ट क्वॉड माझ्या १२० सभासदांनी भरून गेला होता. एवढ्या लोकांना तिथे बघून मीही दचकलो. या उदंड प्रतिसादामुळे कॉलेजच्या परवानगीनुसार वूड्समध्ये मीटिंग घेतली आणि त्यावर्षीच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या कामाला जोमाने सुरुवात केली. मुख्य म्हणजे वर्षाची झालेली ही दमदार सुरुवात शेवटपर्यंत कायम होती. मंडळाच्या सगळया जबाबदाऱ्या पार पाडणं काही सोपं काम नव्हतं. आम्हाला अनेक अडचणींचा सामनादेखील करावा लागला. पण असं असलं तरी समस्त कार्यकारिणीसोबत काम करताना बरंच काही शिकायला मिळालं आणि आपण आपल्या मातृभाषेसाठी काहीतरी विशेष करत आहोत याचं समाधानही मिळालं.

एकेकाळी कॉलेजच्या फॉयरमध्ये झालेला पहिलावहिला ‘आमोद’ लवकरच मोठा होत थेट कॉलेजच्या सभागृहामध्ये जाऊन पोहोचला. मराठी वाङ्मय मंडळाची वाढणारी प्रसिद्धी, मिळणारा उत्तम प्रतिसाद, सदस्यांची तुफान गर्दी पाहून आम्हीही भारावून गेलो होतो. सोबतच कॉलेजमधील शिक्षक, विद्यार्थी आणि सर्व सदस्यांची प्रचंड उपस्थिती पाहून आम्हाला फार आनंद झाला. एकेकाळी केवळ २०-२५ जणांचं मराठी वाङ्मय मंडळ अशी ओळख असलेल्या मंडळाने संपूर्ण कॉलेज व्यापून टाकलं होतं, हे पाहून आमचं मन भरून आलं. जणू काही आम्हाला मिळालेल्या यशाची ती एक पावतीच होती.

२०१२ पासून ते २०१७ पर्यंत पखरण चे सर्व अंक वाचत असताना माझाही लेख या अंकामध्ये असावा असं नेहमी वाटायचं. आज कॉलेज संपल्यावर का होईना, पण ती इच्छा पूर्ण झाली. कॉलेज संपलं तरी मंडळाकडून विविध कार्यक्रमांसाठी बोलावणं येणं हीच आमच्या मराठी वाङ्मय मंडळाची खासियत आहे. आजही जेव्हा जेव्हा मी कॉलेजमध्ये पाऊल ठेवतो तेव्हा तेव्हा चेहऱ्यावर एक स्मितहास्य असतंच. तेच सर्व सांगून जातं...!

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# एकल पालकत्विक कुटुंबातील जडणघडण

**कनकांगी भाभे**

**प्रथम वर्ष, कला शाखा ( संगीत विभागप्रमुख )**

मी एकल पालकत्व अस्तित्वात असलेल्या घरी गेल्या दहा वर्षांपासून राहत आहे. माझ्यासाठी ही एक समस्या आपल्या भारतीय कुटुंबशैलीचा अभ्यास करण्याची अन् लोकांचं 'सिंगल पॅरेन्टिग'बद्दलचं मत प्रत्यक्षात जाणण्याची संधी होती. भारतात 'कुटुंब' म्हटलं, की आपल्या मनात एकच चित्र उभं राहतं- एक पुरुष, एक स्त्री (ज्यांचं अर्थातच लग्न झालंय अशी आपली समजूत असतेच!) आणि त्यांची एक किंवा दोन मुलं. पण आज वस्तुस्थिती पाहिली तर सगळीच कुटुंब अशी असतात का? आपण 'कुटुंब' या संस्थेला एकाच अर्थापर्यंत मर्यादित ठेवतो. एकट्या आईने स्वतःच्या हिमतीवर सांभाळलेलं संपूर्ण कुटुंब मुंबईसारख्या शहरातील प्रगतीशील, सुशिक्षित माणसांनाही पचायला जड जातं. माझ्या पालकांच्या घटस्फोटानंतर खूप लोकांच्या वागण्यावरून, बोलण्यावरून आम्हाला त्यांनी समाजात वेगळं पाडल्याचं दिसून येत होतं. आमच्या कुटुंबाला समाजाच्या पारंपरिक व्याख्येनुसार परिपूर्ण 'कुटुंब' म्हणू शकत नाही, याची सतत जाणीव करून दिली जात होती. लहानपणी हे सगळे असे का वागत आहेत हे उमजत नव्हतं.

एकल पालकत्व असलेल्या कुटुंबात राहणं हा वेगळाच अनुभव असतो. कित्येक समस्या तुमच्यासमोर आ वासून उभ्या राहतात. पण त्या घराघरातल्या समस्यांसारख्याच असतात. आमच्या समस्या काही जगावेगळ्या नसतात. आमच्या घरात कुणी वडीलधारी व्यक्ती नाही म्हणून आम्हाला परिपूर्ण कुटुंबाचा दर्जा मिळत नाही. त्याचप्रमाणे शेजारचे लोक आमच्या वागणुकीवर आणि हालचालींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवतात. आम्ही जरा कुठे चुकलो, की ह्यांनी आईला विनाकारण बोल लावलेच म्हणून समजा. त्यामुळेच मला माझी प्रतिमा माझ्या समवयस्कांपेक्षा जास्त जपावी लागते. आसपास असणारे इतर वडीलधारे, ओळखीतले कित्येक पुरुष हे नेहमी 'father figure' बनण्याचा प्रयत्न करत असतात. अर्थात, हे सगळं ते काळजीपोटीच करत असतील. एकल पालकत्व हे मुलांच्या संगोपनासाठी पुरेसे नाही, अशी त्यांची समजूत असावी. पण त्यांच्या या अशा वागण्याची कुठेतरी आम्हाला खंत वाटते.

एकल पालकत्विक कुटुंबात राहण्याचे बरेच फायदे असतात. आपले स्वतःचे नियम आणि तत्त्वं बनवण्यासाठी त्यात जास्त संधी आणि स्वातंत्र्य मिळते. कुणाचं ऐकावं आणि कुणाचं नाही, हे ठरवण्याची क्षमता लहानपणीच निर्माण होते. आपल्या कुटुंबात वडील नाहीत याची खंत पूर्वी

वाटायची. पण आता कळतंय, की जे झालं ते खरं तर चांगलंच झालं. जी होती त्यापेक्षा खूपच सुंदर परिस्थिती आता निर्माण झाली आहे. आमच्यातल्या कौशल्याच्या आणि कलागुणांच्या वाढीसाठी अतिशय सकारात्मक वातावरण निर्माण झालंय.

अर्थात एकल पालकत्व नेहमी सकारात्मकच असतं असं नाही. पण ते नेहमीच वाईट आणि चिंताजनकही नसतं. त्याबरोबर येणाऱ्या कित्येक अडचणी आहेत आणि त्यासोबत करावा लागणारा त्यागही आहेच. पण आपल्या सच्च्या माणसांसोबत राहण्याचा आणि त्यांच्यासोबत कालागणिक परिपक्व होण्याचा आनंद हा थोड्याशा त्यागाशिवाय अनुभवायला मिळत नाही. आणि एका वाईट परिस्थितीतून चांगल्या परिस्थितीत जाण्यासाठी कधीतरी कठोर निर्णय घ्यावाच लागतो, नाही का? हा विचार करूनच आम्ही मनःशांती आणि आनंदाला प्राधान्य दिलं. आज समाजात वावरणाऱ्या कित्येक पारंपरिक कुटुंबांप्रमाणे आमच्याही कुटुंबाच्या गोष्टीला ‘happy ending’ असेल अशी मी आशा करते.

# स्त्री

**सानिका कुलकर्णी**

**प्रथम वर्ष, बी. वॉक. टुरिझम**

जी सगळ्यांची घेते काळजी छान,
तिचाच नाही राखत कोणी मान!

प्रत्येकजण पाहतो स्वतःचा स्वार्थ
पण हीच सतत वागते केवळ निःस्वार्थ

लहानपणापासूनच असते ती समजूतदार
पण घरापासून ती दूर गेल्यावर तिच्यासाठी
लिहीत नाही कोणी एकही तार...!

माहेराहून गेल्यावर सासरला
सगळ्या कला सोडून निवडते ती पाककला

सर्वांमध्ये अडकून ठेवते ती तिचा जीव,
पण कोणीच नाही करत तिची कींव

तिलादेखील आहे जगण्याचा अधिकार
करते ती प्रत्येक संकटाचा प्रतिकार

जी सगळ्यांची घेते काळजी छान,
तिचाच नाही राखत कोणी मान!!

# भूतकाळाचं भूत

**ईशी महाजन**

**प्रथम वर्ष, विज्ञान शाखा**

तिने बाबांना भावाने केलेल्या त्या गलिच्छ स्पर्शाबद्दल सांगितलं,
पण कसं कोण जाणे, तिने स्वतःवरच संकट ओढवून घेतलं.
बाबांचा विश्वासच बसेना, त्यांनी उलट तिलाच दमदाटी केली,
अन् ती दहा वर्षांची पोर एकटीच कोपऱ्यात रात्रभर रडत बसली.

आज पंधरा वर्षांनंतरही ती त्याच कोपऱ्यात तशीच रडत होती,
जेव्हा बाबा तिला तिच्या फेसबुकवरील #MeToo पोस्टबद्दल ओरडले.
पंधरा वर्षं उलटल्यावरही तिचं कुटुंब काहीच न घडल्यासारखं वागतंय,
पण आज पंधरा वर्षांनंतरही तिच्या भूतकाळाचं भूत तिला सतावतंय.

प्रत्येक दिवशी ती स्वतःला 'निडर हो' असं बजावतेय,
तरीही दर रात्री घराकडे वळणारा तो रस्ता तिला पछाडतोय.
आज तर जणू तिच्या पायाखालची जमीनच सरकली,
जेव्हा तिने एरवी हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या भावाला घरात जाताना पाहिलं.

इतक्या वर्षांनंतरही त्याची तीव्र कामवासना काही शमली नाही,
पण तिला कळून चुकलं होतं- आता नाही तर पुढे कधीच नाही.
तिने जवळची धातूची मूर्ती उचलली आणि त्याच्यावर जोरदार वार केला,
त्या आकस्मिक हल्ल्याने तो जागच्या जागी थिजून गेला.

त्याने आक्रोश केला, रडला, कळवळला,
ती मात्र त्याला दुःखात पाहून समाधानाने हसली.
आज तब्बल पंधरा वर्षांनी तिला सुखाची झोप लागली,
भूतकाळाची भूतं भूतकाळातच राहिली.

अखेरीस सत्याचा विजय होतो हे तिला ठाऊक होतं,
पण त्यासाठी आपल्यालाच पहिलं पाऊल उचलावं लागतं, हे आत्ता कुठे उमगलं होतं.

**(अनुवादित)**

# बाप्पाच्या आठवणी

## पियुष बारटक्के

**प्रथम वर्ष, कला शाखा**

गणपतीला मोदक आवडतात ही गोष्टच मुळी मला लहानपणापासून खूप आवडायची. मोदकाचा नैवेद्य बाप्पाला दाखवला जायचा खरा; पण शेवटी तो आमच्याच पोटात जायचा! एकदा असेच स्वादिष्ट उकडीचे मोदक खात असताना पार्वतीने गणपतीची निर्मिती कशी केली, हे आईने सांगितल्यावर मला खूप आश्चर्य वाटलं. माझ्या आईनेही मला असंच तयार केलं असेल का, असंही वाटून गेलं.

मला लहानपणापासूनच घरच्या गणपतीपेक्षा घराजवळच असणाऱ्या हनुमान मंदिरातील सार्वजनिक गणपती जास्त आवडायचा. विस्तृत पटांगणातील हे हनुमान मंदिर म्हणजे आम्हा लहान मुलांचा आवडता अड्डा होता. दुसऱ्या गल्लीत राहणाऱ्या आमच्या मित्रांना खेळायला अशी मोकळी जागा कधीच मिळायची नाही. या गोष्टीवरून आम्ही खूप भाव खायचो. कोणताही खेळ खेळताना त्याचा डाव आमच्या या मित्रांवर यायचा! मंदिराच्या भिंतीलगत गोट्या खेळून खेळून आम्ही त्या भिंतीला भलेमोठे खड्डे पाडले होते. क्रिकेट खेळताना या भिंतींनाच आम्ही स्टम्प्स बनवायचो. त्यामुळे पावसाळ्यात मंदिराच्या शक्य तेवढ्या भगव्या भिंती आम्ही चिखलाने माखलेल्या बॉलने खेळून अगदी गडद तपकिरी पोलका डॉट्सनी रंगवल्या होत्या.

या गरीब मंदिराची रया खऱ्या अर्थाने परत यायची ती गणेशोत्सवातच! पापुद्रे पडलेल्या त्याच्या भिंती नवीन रंगाने रंगवल्या जात. त्याच्या उंच कळसावर विद्युत रोषणाई करण्यात येई. त्यावेळी कळसावर चढण्याची संधी ज्या मुलाला मिळेल त्याचा आम्हाला फार हेवा वाटायचा. आपल्याला त्या उंच शिखरावर केव्हा चढायला मिळे असं वाटायचं. पण नंतर जेव्हा आम्ही वर्गणी गोळा करण्यासाठी मोठ्या मुलांसोबत जायचो तेव्हा हे सगळं वर्गणीदारांबरोबर हुज्जत घालताना आम्ही सहज विसरायचो सुद्धा!

दरवर्षी चतुर्थीच्या दिवशी वाजतगाजत गणपतीची स्थापना व्हायची. पुजाऱ्याच्या हातात असणाऱ्या त्या छोट्या काळ्या यंत्राबद्दल आम्हाला कोण आश्चर्य वाटे! आम्हाला नंतर कळलं, की त्या यंत्राचं नाव 'माईक' असं आहे ते! माईक वापरून बोलण्यासाठी आमच्यात काय चढाओढ लागायची! पुजारी कितीही खेकसले तरी आम्ही तिथून जराही हलायचो नाही. आरतीच्या शेवटी गणपती बाप्पा मोरया   असं इतक्या जोराने ओरडायचो, की तो पुजारी कानच बंद करायचा!

नंतर ज्या भाविकांनी प्रसाद आणला असेल ते त्या प्रसादाचं वाटप करायचे. आमच्या इवल्याशा हातात प्रसाद राहायचाच नाही. आम्ही लगेचच प्रसाद खायचो आणि पुन्हा पुढच्या माणसाकडे प्रसाद मागायला जायचो! नंतर नंतर तर प्रसाद घेण्यासाठी आम्ही घरूनच कागद न्यायचो आणि भरपूर प्रसाद घरी आणून खायचो.

गणपती विसर्जनाचा दिवस आला की आमच्या आनंदाला उधाण यायचं. त्या दिवशी सकाळी मंदिरात तोबा गर्दी असायची. त्या गर्दीतून इकडून तिकडे धावताना खूप मजा यायची. नंतर ढोल-ताश्यांच्या गजरात गणपतीला गाडीत चढवण्यात यायचं. एरवीची ती भिक्कार गाडी सजवल्यानंतर एवढी बदले, की एकदम ती ओळखूच यायची नाही. गावाजवळच्याच ओढ्यावर विसर्जनासाठी पोहचायला मिरवणुकीला खूप वेळ लागायचा; पण आम्ही मात्र गाण्यांच्या तालावर नाचायला उत्सुकच असायचो. शेवटी त्या ओढ्याच्या पाण्यात गणेशाची विधिवत पूजा करून मूर्ती विसर्जित करण्यात येई. नंतर आम्ही घोळक्याने गप्पा मारत परत घरी यायचो. मोठ्या आनंदात सुरू झालेला हा उत्सव बाप्पा गेल्यावर मात्र त्याच्या आठवणींनी आम्हाला सुना सुना वाटू लागे.

हे सगळं लिहीत असताना बालपण एखाद्या सिनेमासारखं डोळ्यापुढून सरकतंय. पण वर्तमानाचे काय? आता गणेशोत्सव साजरा करावासा वाटतो का...? तर आपसूक मनात नाही असंच उत्तर येतं.

गणेशाबद्दल मनात खूप आदर असला तरीही आताच्या गणेशोत्सवाकडे पाय फिरकत नाहीत. जसजशी जाण यायला लागली तसतसं सगळं फिकं वाटू लागलं आहे. संगीत लाऊड झालं असलं तरी अलीकडे त्याचाही आवाज क्षीण होत गेला आहे. वर्गणीच्या पैशांचा होणारा अपहार खुपायला लागला आहे. भरमसाठ पैसे खर्च करून उभारलेला तो भव्यदिव्य सुंदर देखावा आणि त्यामागे चालणारे धंदे दिसताच मन उबू लागतं. त्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीत पूर्वीचं तेज दिसत नाही. आता जरी दर दहा फुटांवर बाप्पा विराजमान होत असले तरी पूर्वीसारखा गणेशोत्सवाचा आनंद लुटता येत नाही. खरंच इतका कंटाळा आला आहे का बाप्पाचा आपल्याला? खरंच इतकं बदललंय का सगळं? प्रत्येक गोष्टीत बदल हे होतच असतात. गणेशोत्सवही त्याला अपवाद कसा ठरेल? पण त्याहूनही जर काही बदललेलं असेल तर ते आपण स्वतः! निखळ आनंद मिळविण्याचा प्रयत्न करणारी आपण मुलं समंजस प्रौढांत रूपांतरित झालो आहोत. अनेक ‘अर्थ’ नव्याने उमगायला लागले आहेत आणि काही चांगल्या आठवणी आता फक्त आठवणीतच राहणार याची आपल्याला आता प्रकर्षाने जाणीव झाली आहे!

• • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# चाहूल
# की अंत?

**सिध्दीता सोनवणे**

**प्रथम वर्ष, कला शाखा**

जग पालथं झालं तरी पुरुषांनाच क्रूर म्हटलं जातं,
पण आयुष्यभर आंधळेपणाने मानलेलं हे (अ)सत्य मन खात राहतं.
याच चाकोरीबध्द जीवनचक्रात माझ्या बायकोमध्ये काहीतरी संचारलं,
अन् तिचं ते नवं रूप मी पहिल्यांदाच पाहिलं.

ती गरोदर होती,
ती या गरोदरपणासाठी तयार होती आणि नव्हतीही.
रागाच्या भरात तिला गर्भपात हाच एकमेव मार्ग दिसू लागला,
पण ती काहीच करू शकत नव्हती, कारण निर्णय माझ्यावर अवलंबून होता.
थांब! ते बाळ जितकं तुझं आहे, तितकंच माझंही आहे.
मी कोण? मी त्याचा पिता आहे!
माझा त्या चिमुकल्या जीवावर काहीच हक्क नव्हता का?
जो तिने आमच्या बाळाला मारण्याचा निर्णय एकटीनेच घेतला?
माझं प्रतिबिंब, माझं गोंडस बाळ ते!
उत्तुंग ध्येयाने मारलं त्याला, की तिच्या आटणाऱ्या जिव्हाळ्याने?
माझं करिअर मला खुणावतंय, ती म्हणाली.
पण माझ्या मनाची सगळी जागा बाळाने आधीच व्यापलेली.
तिला माझ्या स्वप्नांशी काहीच देणंघेणं नव्हतं.
बाळ हे पुरुषाचंही असतं, हे बहुदा तिच्या लक्षात आलं नसावं.

मी नेहमीच बाळाची स्वप्नं पाहायचो, त्याचं ते मनमोहक हास्य, ती इवली पावलं,
मात्र आता ते फक्त स्वप्नच राहील, मैलोन् मैल दूर असलेलं.
परत ये बाळा, माझ्या तान्हुल्या,
कोणत्या नकाशावर शोधू मी आता तुला?
तुझा बाबा तुझ्यावर खूप प्रेम करतो, ऐकतोयस का रे?
जमलं तर माफ कर मला, तुला मी जाऊच कसं दिलं?
तूच एकमेव कारण होतास ज्यासाठी मी इतकी वर्षं थांबलो,
पण शेवटी एक सच्चा बाप बनण्यात कुठेतरी कमी पडलो…

**(अनुवादित)**

# श्रमसंस्कारांची शिदोरी

**प्रचिती म्हात्रे**

**द्वितीय वर्ष, कला शाखा (उपसचिव, इव्हेंट्स)**

यंदा उन्हाळयाच्या सुट्टीत बाबा आमटे यांनी सुरू केलेल्या श्रमसंस्कार छावणीत मला सहभागी होण्याचा योग आला. मनानेही तरुण असलेल्या तब्बल पाचशे युवक-युवतींसोबत सात दिवस विदर्भातील 'मूल' या गावात सोमनाथमधील या छावणीचं यंदा ५० वं वर्ष होतं. मुंबईच्या गर्मीत ट्रेनमध्येही ए.सी. हवा अशी मागणी करणारी आम्ही मुलं ऐन उन्हाळयात ४६- ४७ डिग्री सेल्सिअस तापमानात कुदळ, फावडे घेऊन दररोज सहा ते सात तास विहिरी आणि तलाव खोदणार होतो! हे सगळं महाअवघड असेल आणि खूप त्रासदायक ठरेल असं छावणीचा फॉर्म भरताना आम्ही सगळेच म्हणत होतो. मात्र तरी काहीतरी नवीन आणि धाडसी काम करायचा आमचा निश्चय पक्का होता.

छावणीच्या पहिल्या दिवसापासूनच त्यात सहभागी झाल्याचा मला अभिमान वाटू लागला. त्या सात दिवसांत मी जे काही शिकले, अनुभवले ती माझी आयुष्यभराची शिदोरी आहे. रोज सकाळी बरोबर ४.३० च्या ठोक्याला आम्ही उठायचो. प्रार्थना संपली की 'भारत जोडो'चा नारा देत, देशभक्ती आणि समाजप्रबोधक गाणी म्हणत आम्ही श्रमदानाच्या ठिकाणी पोहोचत असू. कधी तलाव खणले, तर कधी झाडं लावली, कधी नदीवर बांध घातले. कधी शेजारच्या गावात जाऊन स्वच्छता अभियानाचा भाग म्हणून संडासही साफ केलं. प्रत्येकाला नेमून दिलेल्या कामानुसार छावणीवर थांबून सहकाऱ्यांसाठी कधी नाश्ता आणि जेवणही बनवलं. तलाव खणताना कुदळीचे घाव कधी बोटांवर पडले, तर घमेली वाहताना हाताला जखमा झाल्या. तासन् तास कुदळ पकडून बोटांना घट्टे पडले. ओणवे वाकून पाठ भरून आली. शेतकऱ्यांबद्दल, कष्टकऱ्यांबद्दल एक नवीन भाव मनात आला. दुपारच्या सत्रात अनेक दिग्गजांसोबत चर्चासत्रं आयोजित केली जायची. त्यांचे विचार ऐकून, त्यांचा ध्येयवेडेपणा आणि जिद्द पाहून एक वेगळाच हुरूप यायचा. केवळ स्वतःसाठी जगण्यातला आणि समाजासाठी स्वतःला झोकून देण्यात मिळणाऱ्या आनंदातला जमीन अस्मानाचा फरक जाणवला. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, सामाजिक बांधिलकी, देशभक्ती, स्त्रियांच्या समस्या, आदिवासींच्या समस्या अशा वेगवेगळ्या विषयांवर चर्चा झडल्या. काही प्रश्नांची उत्तरं सापडली, तर काही नवीन प्रश्नदेखील पडले.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाहेर ४७-४८ डिग्री तापमान असले तरी सोमनाथ परिसरात खूप आल्हाददायक वातावरण होतं. याचं मुख्य कारण म्हणजे त्या ठिकाणी सतरा मोठे काठोकाठ भरलेले तलाव होते आणि संपूर्ण गावात असलेली हजारो झाडं! एकेकाळी हे सगळं गाव ओसाड होतं.

मात्र बाबा आमटेंनी पन्नास वर्षांपूर्वी काही कुष्ठरोगी बांधवांसोबत या ठिकाणी विहिरी खणल्या, मातीचे बांध घालून जमीन शेतीसाठी तयार केली, घरं बांधली आणि हे गाव उभारलं. ज्यांची बोटे झडलेली होती, ज्यांना समाजाने झिडकारलेलं होतं, ज्यांना रस्त्यावर तडफडत मरायला सोडून दिलं गेलं होतं, त्या कुष्ठरोग्यांनी जिद्दीने "शृंखला पाई असू दे, मी गतीचे गीत गाईन, दुःख उगाळण्यास आता आसवांना वेळ नाही!" असं म्हणत या ठिकाणी नंदनवन उभारलं. ही गोष्ट ऐकून मला स्वतःची लाज वाटली. निसर्गाने संपूर्ण धडधाकट शरीर दिलेलं असूनदेखील आपण कित्येक वेळा परिस्थितीला दोष देत कितीतरी जबाबदाऱ्या टाळतो. आणि या कुष्ठरोगी बांधवांनी हाताची बोटं झडलेली असताना, हाडांतून रक्त निथळत असताना, सामाजिक बहिष्काराच्या मानसिकदृष्ट्या त्रस्त परिस्थितीतही कष्टाचं चीज करून हे गाव उभं केलं. आज स्वतःची शेती स्वतः कसून ते स्वावलंबी झाले आहेत. त्यांना प्रेरित करण्यात बाबा आमटेंचा सिंहाचा वाटा आहे. मी काय गमावलंय, यापेक्षा माझ्याकडे काय आहे, यावर आपलं लक्ष केंद्रित करून पुढे जाण्याचा धडा मी त्यांच्याकडून शिकले.

आपण शहरातील माणसं सरकारला, सामाजिक वातावरणाला आणि परिस्थितीला सतत दोष देत असतो. आपण खूप नकारात्मक वृत्ती घेऊन जगतो. पण छावणीत मला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातली अशी काही माणसं भेटली, ज्यांनी आपापल्या परीने पीडित वर्गासाठी आपण काय काय करू शकतो याची उदाहरणं आमच्यासमोर ठेवली होती. एका सत्तावीस वर्षांच्या युवकाने आपल्या पत्नीच्या सोबतीने चाळीस अनाथ मुलांना दत्तक घेतलं आणि स्वतःच्या केवळ २५००० रुपयांच्या पगारामध्ये तो गावात या मुलांसोबत राहतो. अशी एक नव्हे, तर अनेक स्फूर्तिदायक माणसं स्वतःच्या उथळ आनंदाऐवजी गरजू, पीडित माणसांच्या समस्या आपल्यापरीने दूर करण्यासाठी काम करत आहेत. कुणीतरी मुलींसाठी सायकली गोळा करतं, तर कुणी रोज स्वतःची नोकरी सांभाळत रात्रशाळा चालवतं. शहरातील तीस हजार रुपयांची नोकरी सोडून कुणी अंध मुलांच्या आश्रमात शिक्षक म्हणून काम करतंय, तर कुणी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या बायकांना आर्थिक व्यवहार शिकवतंय. छावणीत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे- कितीही नाही म्हटलं तरी आजही सामाजिकबांधिलकीचं भान ठेवून जगणारी अनेक माणसं आपल्या आसपास आहेत.

ते छावणीचे सात दिवस प्रत्येक क्षणी काही ना काही नवं शिकवत होते. आपल्याकडे तसा बराच वेळ असतो. मात्र कोणत्या गोष्टी कधी पूर्ण कराव्यात याचा प्राधान्यक्रम आपण ठरवलेला नसतो याची जाणीव होऊ लागली. छावणीत विचारमंथन सुरू झालं होतं आणि त्यातूनच माझ्यात एक ठिणगी पेटली होती. या ठिणगीमुळे सामाजिक समस्यांबद्दल वाटणारी अस्वस्थता मनात कायम धगधगत राहणार आहे. इतरांच्या दुःखांकडे पाहून माझ्या चिंता आता फारच क्षुल्लक वाटू लागल्या आहेत. आजूबाजूच्या प्रश्नांकडे मी आता डोळसपणे बघू लागले आहे. या छावणीने मला एक नवी दिशा आणि नवी आशाही दाखवली आहे.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# मराठी कादंबरी आणि आधुनिकता

**सौरभ खांडगे**

**झेविअर्स इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन**

वेगाने बदलणाऱ्या आजच्या आधुनिक जगात म्हणजेच २१ व्या शतकात आपण वावरत आहोत. कळत- नकळत आपण पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण करत आहोत. जुन्या गोष्टी, जुने संदर्भ निरर्थक ठरवण्यात धन्यता मानत आहोत. हे असं वागणं कधी ना कधीतरी नक्कीच आत्मघातकी ठरेल. कदाचित ही आधुनिकता पचवण्यासाठी येणा-या काळात सगळ्यांना संतसाहित्याचा आधार घ्यावा लागेल. संत ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राचा श्वास होते, तर संत तुकाराम महाराज नि:श्वास! तर समर्थ रामदास, संत एकनाथ ध्यास आहेत. याच ध्यासापोटी त्यांनी लोकजीवनाचं उत्कट दर्शन घेतलं आणि तितक्याच उत्कटतेने ते साहित्यातून व्यक्त झाले. मराठी भाषेच्या नगरीत ब्रह्मवि द्येचा सुकाळ करून ज्ञानदेवांनी भागवत धर्माच्या साध्या-भोळ्या भक्तीला मानवतावादाची बैठक दिली. तर तुकोबारायांनी या मानवतावादाला अखंड ऐक्याच्या वैश्विक पातळीवर नेऊन बसवलं. म्हणूनच विश्वचैतन्याचे तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ या दोन्ही भूमिकांतून या मंडळींनी केलेला विचार म्हणजेच संतसाहित्य. आधुनिक युगातल्या सगळ्या प्रगत संकल्पना संतसाहित्यात सापडतात. आपले संत विज्ञाननिष्ठ होते. व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि जगाचा विचार करणाऱ्या या संतांनी शेकडो वर्षांपूर्वीच सकारात्मक जागतिकीकरणाचा विचार मांडला होता. संतांच्या वैचारिक चळवळी, त्यातील वैश्विक जाणिवा, भावदर्शन, लोकसंवाद आणि वैज्ञानिक दृष्टी संतसाहित्याच्या माध्यमातून व्यक्त होतात.

तेराव्या ते अठराव्या शतकादरम्यान अठरापगड जातींतील या संतांच्या कालखंडात त्यांच्या जगण्यात उच्च-नीच असा भेदभाव नव्हता. आज आपण महिला सक्षमीकरणाची भाषा करतो. पण महिलांचे सक्षमीकरण तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताबाई आणि जनाबाईंच्या नेतृत्वात आढळते. प्रसार माध्यमांचा विकास आणि प्रसार होण्याआधी कीर्तनं, पुराण, जागरण- गोंधळ, ललित, भारूड यांसारखे अनेक लोककलाप्रकार मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसा म्हणून दिले गेले आणि यातूनच त्या काळात समाजप्रबोधन होत गेले. जसजसा काळ बदलत गेला तसतशी माणूस समजून घेण्याच्या निकडीतून कादंबरी निर्माण झाली. ब्रिटिश काळापासून मध्यमवर्गीय समाजाची निर्मिती होऊ लागली. या मध्यमवर्गीयांच्या व्यथा, भावभावना मध्यमवर्गीय

लेखकांनी आपल्या साहित्यातून शब्दबद्ध केल्या. त्यामधूनच एक वेगळा लेखकवर्ग निर्माण होऊ लागला. या मध्यमवर्गी यांच्या भावना फक्त त्यांच्यापुरत्याच मर्यादित होत्या. मध्यमवर्ग हा कादंबरीच्या कालखंडाचा निर्माता मानावा लागेल. मध्यमवर्गीय लेखकांनी जगण्याविषयीचं आपलं मत, आपलं आकलन व्यक्त करण्यासाठी कादंबरी निर्माण केली आणि वाचकांना या कादंबऱ्या आवडूही लागल्या. परंपरेच्या विरोधात जाऊन कादंबऱ्यांतून आपण काही प्रश्न उपस्थित करू शकतो याची जाणीव आधुनिकतेमुळे लेखकांना आली.

मात्र आधुनिक कादंबरीचं आजचं स्वरूप पाहता ते खूपच बदललेलं दिसत आहे. मागील सर्व दोष बाजूला सारून मराठी कादंबरीने वेगळं वळण घेतलं आहे. आज माहिती -तंत्रज्ञानाच्या युगात कादंबरीचे महत्त्व वाढले आहे आणि त्यात समाजाचे प्रतिबिंब उमटत आहे. पण ताकदीचे मराठी लेखक आज निर्माण होत नसल्याचं चित्रही दिसत आहे. आजही मराठी साहित्याबद्दल बोललं गेलं तर जुन्याच लेखकांचे संदर्भ हमखास ऐकायला मिळतात. पण आपण आजही त्यांचीच पुस्तकं वाचतो आहोत. हा मराठी कादंबरी चा आणि परिणामी आपला मागासलेपणा मानायचा का? आजच्या घडीला अच्युत गोडबोले, निरंजन घाटे यांसारखे लेखक या सगळ्या सीमांना भेदून आर्थिक, वैज्ञानिक-मनोवैज्ञानिक अंगाने लेखन करताना दिसतात. आज मराठी कादंबरीत विविध क्षेत्रातील वास्तव, प्रश्न आणि समस्या व्यक्त होत आहेत. हा मराठी कादंबरीविश्वाचा नवा अध्याय मानावा लागेल.

# सिंड्रेलाचा बुट

**स्वरांगी जाधव**

**अकरावी, कला शाखा**

सकाळी नऊच्या लोकलला नेहमीची गर्दी होती. बांद्रयाला उतरल्यानंतर स्वातीने गीताला हाक मारली आणि दोघी नेहमीप्रमाणे चालू लागल्या. चालता चालता स्वातीचं लक्ष गीताच्या बुटांकडे गेलं. "ए, थंडी सुरु झाली तर! अगदी शूज वगैरे घालून आली आहेस!", इति स्वाती. स्वातीचं बोलणं पूर्ण होतं न् होतंय तोच गीता तिचं वाक्य मध्येच तोडत उदासवाण्या स्वरात म्हणाली, "अगं, काय सांगू तुला? तू काल नव्हतीस ना. काल संध्याकाळी ट्रेन पकडताना माझी चप्पल पडली प्लॅटफॉर्मवर. म्हणून मग आज हे बूट घालावे लागले." "चप्पल कशी काय पडली?" "अगं, आपली नेहमीची ५.४४ ची ट्रेन पकडत होते. कसली तुडुंब गर्दी होती काल गाडीला! मला तर वाटलं, आज चढायला मिळतंय की नाही. इतक्यात गाडीत चढताना कोणाचा तरी पाय पडला गं माझ्या चपलेवर. मी पुढे टाकायला पाऊल उचललं तर नाही. इतक्यात गाडीत चढताना कोणाचा तरी पाय पडला गं माझ्या चपलेवर. मी पुढे टाकायला पाऊल उचललं तर चप्पल राहिली मागे आणि गर्दीच्या रेट्यात मी गेले पुढे!" चपलेबद्दल बोलताना गीता खूपच भावूक झाली होती.

"अरेरे! पण तू ती चप्पल उचललीस की नाही?", स्वातीने काळजीनं विचारलं. "नाही गं! काय करावं कळत नव्हतं. आणि चढताना गर्दी तर अशी होती, की मी मागे वळूच शकत नव्हते." "अगं, पण मग प्लॅटफॉर्मवरच्या कोणीतरी ती आत टाकायला हवी होती ना?" "नाही ना टाकली कोणी. मी ओरडून सांगितलं कित्येकांना... पण तेवढ्यात ट्रेनही सुरु झाली. ट्रेनमधल्या बायकांनी उतरल्यावर मला नवीन चप्पल घ्यायला सांगितलं."

"मग त्या एका चपलेचं काय केलंस? फेकून दिलीस?" "नाही गं! चालत्या गाडीतून कुठे आणि कशी फेकू चप्पल? पर्समधून पिशवी काढली आणि ठेवली त्यात. म्हटलं, उतरल्यावर देऊ टाकून." "आणि त्यानंतर घरी कशी गेलीस तू?"

"अनवाणी! आणखी काय करणार? मी ती चप्पल पिशवीतून तशीच घरी नेली. पण फेकली नाही. मला फार आवडायची गं ती चप्पल! आमच्या ह्यांनी मला लग्नाच्या वाढदिवसाला सरप्राइज गिफ्ट दिली होती ती."

गीताच्या मनातून तिची हरवलेली चप्पल काही केल्या जात नव्हती. बोलता बोलता दोघीही आपापल्या ऑफिसकडे वळल्या.

त्याच दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे स्वाती ५.४४ ची ट्रेन पकडायला प्लॅटफॉर्मवर आली. पाहते तर काय! तिथे गीता तिच्या आधीच पोहोचली होती आणि तिच्याभोवती चार-पाच जणींचा घोळका ही होता. स्वातीला वाटलं, आजही हिने काहीतरी गोंधळ घातलेला दिसतोय. ती गीताजवळ गेली. "आज काय पाडलं स तू?" स्वातीने हसतच विचारलं. स्वाती भेटल्याचा गीताला खूपच आनंद झाला.

" अगं स्वाती, चप्पल मिळाली!!!" गीताच्या चेह-यावरील आनंद ओसंडून वाहत होता. हरवलेलं सोनं सापडल्यासारखी खूश झाली होती ती.

"काय म्हणतेस काय? कुठे मिळाली? कशी आणि कधी?", स्वातीलासुद्धा खूप आनंद झाला.

"अगं, इथेच ट्रॅकमध्ये पडली होती. आताच काढली बघ."

"पण कशी?"

"अगं, कालच्या गोंधळात ती चप्पल ट्रेनच्या खाली गेली. आज मी सहजच ट्रॅकवर वाकून पाहिलं तर चप्पल तिथेच पडलेली होती."

"अय्या! मग? काढलीस कशी? कोणी काढली?"

"इथून दोन मुलं जात होती, त्यांना रिक्वेस्ट केली. ट्रेन यायला सात मिनिटं होती. त्यातला एकजण ट्रॅकमध्ये उतरला आणि त्याने टाकली चप्पल प्लॅटफॉर्मवर. नंतर पटकन् प्लॅटफॉर्मवर येऊन तो गर्दीत दिसेनासा झाला! माझं थँक्यू ऐकायलाही थांबला नाही."

गीताला झालेला आनंद तिच्या डोळ्यांतू न स्पष्टपणे दिसत होता. तिने आपल्या पर्समधून एक पिशवी काढली आणि त्यात ती चप्पल ठेवली.

मुंबईसारख्या धावत्या शहरात हरवलेल्या वस्तू सहसा पुन्हा सापडत नाहीत. आणि इथे तर जवळजवळ चोवीस तासांनंतर गीताला तिची चप्पल सापडली होती. त्यामुळे तिला आनंद होणं स्वाभाविकच होतं. नाही का?

कसं असतं ना? आपल्या जवळच्या माणसांसोबत जसं आपलं घट्ट नातं असतं, तसंच आपलं अनामिक नातं आपण वापरत असलेल्या निर्जीव वस्तूंसोबतही निर्माण झालेलं असतं. आणि अचानक ती वस्तू हरवली की मग तो दुरावा स्वीकारणं अवघड होऊन बसतं. मनाला रुखरुख अन् जीवाला हुरहूर लागते. या साऱ्या प्रकारानं मला गोष्टीतल्या सिंड्रेलाची आठवण आली. वेळेच्या मर्यादेमुळे तिला आपला बूट परत नेता आला नव्हता. इथेही ही घटना ज्या परिस्थिती त घडली त्यात गीताला आपली पडलेली चप्पल उचलता आली नव्हती. सिंड्रेलाचा तो बूट वेगवेगळ्या मार्गाने तिच्यापर्यंत पोहोचला होता. आणि इथेही आपली सिंड्रेला तिच्या चपलेपर्यंत पोहोचली होती.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# Snowlan Epicure
## Luxury Beauty & Wellness
## Gourmet Food & Beverages

# COLOMBIAN BREW
# COFFEE










WWW.SNOWLANEPICURE.COM




नभं उतरू आलं



तेजोमय प्रकाशन



मराठी भाषा दिवस






कार्यशाळा



कार्यकारीणी





मराठी पाऊल पडते पुढे- एक बौध्दिक पर्वणी





मुंबईतील सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळाचा पावसाळी कार्यक्रम उत्साहात, विद्यार्थ्यांनी

# 'नभं उतरू आलं' बरोबर 26 जुलैच्या कटू आठवणींना

। मुंबई ✍ प्रतिनिधी ।

दरवर्षी पावसाळा आला की २६ जुलैची आठवण आल्याशिवाय राहत नाही. २००५ मध्ये याच दिवशी महापूर येऊन मुंबई पाण्याखाली गेली. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाल, अशी परिस्थिती मुंबईकरांवर पुन्हा ओढवू नये अशी प्रार्थना प्रत्येक मुंबईकर कायमच करत राहणार आहेत, अशी प्रार्थना सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळानेदेखील केली. मुंबई येथील महापालिका भागातील सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या वाङ्मय विभागाचा नभं उतरू आलं. हा कार्यक्रम नुकताच पार्श्वभूमीवर पडला.

## प्रमुख अतिथी प्राध्यापक गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते कार्यक्रमाचा श्रीगणेशा



कार्यक्रमाची थीम 'पाऊस' असल्याने पावसाची गरज तशीच हानी मनोरंजक प्रयत्नांनी साद... करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मुंबई विद्यापीठातील लोककला विभागाचे प्रमुख गणेश चंदनशिवे ... करण्यात आले. परमेश्वराच्या ...

पावसाची प्रेमगीतेही सादर

» प्रियकराची पावसावर... प्रेमगीतातून सादर करण्... कार्यक्रमाचे सर्वात मोठे आ... ...टक ज्यातून

# तेजोमय सोहळा



...ले, सेंट झेविअर्स कॉलेज

...लेजचं मराठी वाङ्मय मंडळ वर्षभरात ...क कार्यक्रमांचं आयोजन करतं ...

अनेकांना लाभ घेता आला. कार्यक्रमाची सुरुवात मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र शिंदे, प्राध्यापक शामला बोधणे व फादर टेरेन्स क्वॉड्रोस यांच्या हस्ते ...

# ...हान मुलांना लिहिते करणे अवघड

## ...जेंद्र शिंदे : 'तेजोमय' दिवाळी अंकाचे प्रकाशन

...कमत न्यूज नेटवर्क

...बई : मराठी भाषा पाहिजे तशी ...लली जात नाही, याची कुठेतरी खंत ...नाला वाटते. मराठी भाषा जास्त ...परली जात नाही. मराठी भाषेवर ...लिहिले जात नाही. मात्र, ...हाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय ...डळाने मराठीची परंपरा कित्येक वर्षांपासून जपून ठेवलेली आहे. मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने 'तेजोमय' सारखा मराठी दिवाळी अंक काढण्यात आला, ही कौतुकास्पद बाब आहे. आजच्या लहान मुलांकडून लेख लिहून घेणे हे अवघड काम आहे. दिवाळीच्या सुट्टीमध्ये दिवाळी अंक वाचण्याची, पूर्वी लोकांमध्ये स्पर्धा असायची. आता बाजारात चांगल्या दर्जाचे दिवाळी अंक

उपलब्ध असतात ... असे प्रतिपाद... अध्यक्ष राजेंद्र... फोर्ट ये... महाविद्यालया... मंडळाच्या वती... आणि वल्ली ... आयोजन ... कार्यक्रमादरम्यान... दिवाळी अंकाचे प्र... हस्ते करण्यात आल... शिंदे बोलत हो... महाविद्यालयाचे प्राच... शामला बोधणे आ... कॉड्रोस् उपस्थित ... दिवाळी अंकाचे हे पा... दरम्यान, 'तेजोमय' दिव... संकल्पना 'व्यक्ती आणि

# मराठमोळा 'आमोद'



## झेविअर्समध्ये होणार मराठीचा गजर

...क्के, सेंट झेविअर्स कॉलेज

### फेस्टची आकर्षणं

- पहिल्या दिवशी म्हणजे १६ जानेवारीला 'चार ओळींची गोष्ट', 'हे सुर संस्कृतीचे' गायन स्पर्धा, 'कला युवती' व 'अमर्यादित' या स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. 'चार ओळींची...' या स्पर्धेचं हे दुसरं वर्ष आहे.
- दुसऱ्या दिवसाचं खास आकर्षण आहे त्या 'स्वरसंवाद' स्पर्धा व 'तो मी नव्हेच' एकांकिका. 'स्वरसंवाद' ही एक गीत गायन ...र्धा आहे. 'नृत्यांगन', 'ती आणि मी'मध्ये ...वायचे आहेत. 'सप्तरंग' ही रांगोळी ... आयोजित करण्यात आली आहे. ...त्त्वाचा असून, या दिवशी ...योजित करण्यात येत ...रे वक्तृत्त्व स्पर्धा ...दोन्ही स्पर्धा ... आहेत.



# ...तलं मराठी वाङ्मय मंडळ

...क्लब रिपोर्टर

...com


...ी भाषा सोडून इंग्रजीकडे ... अशी ओरड मोठ्या ...च कारणामुळे मराठी ...निर्माण झाली आहे. ... वाङ्मय मंडळं ...नशील आहेत.

मिळावं यासाठी वाङ्मय मंडळ प्रयत्नशील आहे. याशिवाय त्यांना त्यांच्या व्यावहारिक आणि विपणन कौशल्याचा विकास करण्याची संधी देखील हे मराठी वाङ्मय मंडळ देतं. मंडळाचे प्रमुख प्राध्यापक राजेंद्र शिंदे यांनी नेहमीच मंडळाला पाठिंबा देऊन वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन केलंय.यंदा ९४ व्या वर्षीसुद्धा मराठी मंडळाची नवीन कार्यकारिणी सभासदांची नियुक्ती झालेली आहे. मंडळात १८ सभासद असून त्यांना पाठिंबा देणारे सुमारे ४०० सहसदस्य आहेत. मराठी वाङ्मय मंडळाने या वर्षभरात अनेक उपक्रम करायचं ठरवलंय. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी ...दारदार कार्यक्रम साजरा ... त्याशिवाय

# 'झेवियर्स'मध्ये 'मराठी पाऊल पडते पुढे'

*संत झेवियर्स* महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'मराठी पाऊल पडते पुढे' - एक बौद्धिक पर्वणी' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या दिग्गजांचे मार्गदर्शन मिळाले. 'नवे वर्ष, नवी वाटचाल' या उपक्रमांतर्गत 'मराठी वाङ्मय मंडळा'ने या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात अतिरिक्त पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे, सामाजिक का... गौरी सावंत, प्रसिद्ध लेखक व वैज्ञानिक बाळ फोंडके, अभिनेता आणि दिग्दर्शक अ... विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समाजात आपण आपल्या कर्तव्य-जबाबदारी... केले पाहिजे असे मत रवींद्र शिसवे यांनी व्यक्त केले. गौरी सावंत यांनी ... त्यांना सर्वसामान्यांसारखी वागणूक मिळावी असे मत व्यक्त केले.

मुंबईतील संत झेविअर्स महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचा 'नभ उत... आलं' हा पाऊस विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची थीम 'पाऊस' असल्याने पावसाची गरज तशीच हानी अत्यंत मनोरंजक प्रकारे सादर करण्यात आली. प्रमुख अतिथी मुंबई विद्यापीठातील लोककला ... प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात ... पावर आधारित एका गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली.




...आकर्षण म्हणजे 'छाया नृत्य' ... ...साचा व त्याच्या जीवनशैलीवर होणार... २६ जुलै २००५ रोजी अनुभवलेल्या ... करण्यात आले. बालपणीचे स्मरण ... ...गेली. अखेरीस कार्यक्रमाचे ...

...ठी पाऊल पडते पुढे या ... आले आहे. हा ... सायंकाळी ६.३० या ...भागृहात पार ...कारी डॉ. राजेंद्र ...त, वैज्ञानिक लेखक ...ळीकर यावेळी ...आहेत.

# सेंट झेवियर्स महाविद्यालयात मराठी भाषेचा एल्गार!

### मराठी संस्कृतीचे जतन

मुलुंड वाणिज्य महाविद्यालयात ४५ वर्षांपासून वाङ्मय मंडळ सुरू आहे. विलेपार्ले येथील मराठी वाङ्मय मंडळालादेखील ४० वर्षे पूर्ण झाली आहेत, अशी अनेक महाविद्यालये आहेत ज्यांनी आपली महाराष्ट्रीयन संस्कृती जपण्याचा अतोनात प्रयत्न केला आहे. प्राचार्य, प्राध्यापकही विद्यार्थ्यांना पाठिंबा दर्शवून मराठी संवर्धनातील भाग बनतात.




१५ जुलै.... बाहेर धुमशान बरसात आणि आत मन चिंब करणारी शब्द सुरांची जुगलबंदी. बाहेर बेभान ...

असेल तर ही मंडळ कायमच महत्वाची ठरतात. या मंडळांच्या सदस्यांसोबत बातचीत झाली तेव्हा कळलं की या मंडळांतून आपणच आपला शोध घेऊ शकतो. पण फक्त करिअरपुरत विचार न करता बरीच मंडळीफक्त मराठीच्या प्रेम आणि संवर्धन पोटी या वाङ्मय मंडळात सहभागी झालेली असतात. ही मुलं या मंडळांना आपलं स्वतःच घरच मानतात. महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळासाठी जीव ओतून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पाहिल्यानंतर आपल्याही मनात एक वेगळाच उत्साह संचारतो आणि आपले महाविद्यालयातले दिवस आठवल्या शिवाय राहत नाही. मंडळाचा कार्यक्रम जवळ आला आपणसुद्धा ... रात्र रात्र करून कार्यक्रमाची ...

किती महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ आहे. मुंबईतील महाविद्यालयांचे मराठी वाङ्मय मंडळ नसल्याच्या अनेक बातम्या वाचन आल्या. याबाबत मुंबई विद्यापीठाने सगळ्या महाविद्यालयांना आपापल्या महाविद्यालयात वाङ्मय मंडळ स्थापन करण्याचे आदेश दिले. त्यानंतर अनेक महाविद्यालयांत मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना झालेली दिसली. मात्र मुंबईत असेही काही महाविद्यालये आहेत जे अगदी स्वातंत्र्यपूर्वी काळापासून महाविद्यालय वाङ्मय मंडळ चालवत आहेत. सुरुवातीलाच नाव घेतलेल्या सेंट झेविअर्स महाविद्यालय हे विद्यापीठातील सर्वात जुने वाङ्मय मंडळ आहे. या महाविद्यालयाने १९२३ पासून वाङ्मय मंडळाची सुरुवात केली. हे महाविद्यालय ...

# लिफाफा

**सानिया पाठारे**

**प्रथम वर्ष, कला शाखा**

आवाजाने गजबजलेल्या शहरातील एक शांत संध्याकाळ... संपूर्ण आकाश सूर्यास्ताच्या रंगोत्सवात गुंतलेलं... रस्त्यावर रहदारीची बेबंदशाही... त्या गर्दीतून धक्के खात आणि मोबाईलवर आपल्या सहकाऱ्यांना दटावत ती घराच्या दिशेने निघाली होती. तशी ती फार वयस्कर नव्हती पण महत्त्वाकांक्षा आणि कष्टांचे परिणाम तिच्या चेहऱ्यावर जरा लवकरच दिसू लागले होते. ती लिफ्टमध्ये शिरली आणि तिने नवव्या मजल्याचे बटण दाबले. लिफ्टमध्ये असताना अनेक विचार तिच्या मनात घोळू लागले. मंजूर केलेल्या पटकथा आणि लेख... 'संवाद'सारख्या गाजलेल्या नियतकालिकाच्या संपादिकेचे अवघड काम... विचार करता करता ती आपल्या फ्लॅटपाशी पोहोचली. कॉरिडॉरमध्ये सगळं नित्याचंच होतं. पण एक गोष्ट मात्र वेगळी होती. डोअर मॅटवर चकाकत असलेला छोटा पांढरा लिफाफा हातात घेऊन ती घरात शिरली. त्यावर ना पाठवणाऱ्याचा पत्ता होता, ना कोणता शिक्का. वरचा लिफाफा अगदी नवा कोरा करकरीत अन् आत कागदाचा एक छोटासा तुकडा... खराब अक्षरात मोजून दोन-तीन ओळी लिहिलेल्या... जणू प्रेषकाला त्या लिहिताना वेळच नव्हता.

"त्यांना वाटलं आत्महत्या होती.
खरं तर तीच स्वतःची खुनी होती.
लेखकाचा लेख आवडता
वाळीत टाकलास विचार न करता."

ती त्या अनाकलनीय शब्दांकडे बघतच राहिली. काय अर्थ आहे या ओळींचा? नक्कीच जवळच्या कुठल्यातरी रिकामटेकड्या मुलाचा हा चाळा असणार असा तिने विचार केला आणि संतापून तिनं तो लिफाफा कचराकुंडीत टाकला. लवकरच त्या लिफाफ्याबद्दल सारं काही विसरून ती आपल्या कामात गुंग झाली. तिने तिचं आयुष्य एकांतात काढायचं आधीच ठरवलं होतं. तिच्याशिवाय त्या घरात कुणीच राहत नव्हतं. दिवसा एक घरकाम करणारी बाई सोडली तर घराकडे कोणी फिरकत नसे.

संध्याकाळ मावळून रात्र झाली. रात्रीच्या त्या मंतरलेल्या आकाशात चांदण्यांच्या फिकट आकृत्या लुकलुकू लागल्या. थकलेला जीव आणि कामाचं कधीही न संपणारं ओझं घेऊन ती घरी पोहोचली. नेहमीपेक्षा आज जरा जास्तच उशीर झाला होता. दार उघडून आत शिरताच तिचा पाय कशावर तरी पडला. पाहिलं तर कालसारखाच आणखीन एक लिफाफा तिला फरशीवर पडलेला दिसला. "ही मुलं पण ना!", असं म्हणत तिने

लिफाफा उघडला .

कालच्यासारखाच एक कागदाचा तुकडा त्यातून बाहेर पडला. तशाच मोडक्यातोडक्या अक्षरांत चार ओळी कागदावर फरपटलेल्या होत्या...

" ज्या सुऱ्याने हृदय मारिले,
तोच त्याने पोटात भोसकला.
रक्त जसे वाहत गेले,
जीव तसा धावत गेला."

"हा काय वेडेपणा? नको ते चाळे यांचे ! कसले विचित्र खेळ आहेत आजकालच्या पोरांचे! सतत टी. व्ही. पाहून बालमनावर झालेले दुष्परिणाम आहेत हे!", असं म्हणत तिने तो कागद फेकून दिला आणि एक दीर्घ श्वास घेऊन आपल्या कामाला लागली.

दार उघडताच घरातील शांततेने तिचे स्वागत केले. मोकळा श्वास घेत ती सोफ्यावर बसली आणि विचारांच्या रिमझिम पावसात ती पुन्हा भिजू लागली. तिची कामवाली आजपासून येणार नव्हती. आता ऑफिस आणि घरकाम यात तिची चांगलीच तारेवरची कसरत होणार होती. एकाएकी तिची नजर समोरच्या टेबलावर पडली. धुळीने माखलेल्या टेबलावर एक स्वच्छ लिफाफा होता. तिला मानेवर कुणीतरी एक थंड हात फिरवल्यासारखे वाटले. हा इथे कसा आला? घरात कोणीच नसताना लिफाफा आत कसा काय येऊ शकतो? तिने तो उचलला आणि घुटमळत त्यातील शब्द वाचले...

"मागे वळताच तिला दिसला
सुरा नाकारलेल्या लेखकाचा.
स्वयंपाकघरातून चालत आले,
फळ तिच्या पापांचे."

तिला काही कळेनासे झाले. कोण करत असेल हे सगळं? काय आहे याचा अर्थ? कोणाची मदत घ्यावी? कामाशिवाय तिला ना कोणी मित्र होता, ना नाते वाईक. पोलिसांकडे गेलं तरी काय सांगणार? निनावी चिठ्या मिळाल्यात हे? हसतील ते आपल्याला!

तिचा चावी धरलेला हात थरथरत होता. स्वतःचं घरही आता तिला भयाण वाटायला लागलं होतं. "कसली भीती वाटतेय आपल्याला? त्या छोट्याशा लिफाफ्याची? इतक्या वर्षांत कोणी आपल्या वाटेला गेलं, तरी आपण एकटीनेच सक्षमपणे तो मामला हाताळला होता. पण काल लिफाफा घरात कसा आला? आणि आजही तसाच एखादा लिफाफा आत असेल तर...? तर बघून घेऊ!", असं म्हणून आपल्या मनाचं समाधान करत ती घरात गेली. नेहमीचं निर्मनुष्य घर आज भरलेलं वाटत होतं. कोणाचं तरी अस्तित्व घरात सारखं जाणवत होतं. पायाखाली बघितलं तर काही नव्हतं. टेबलावरही काही नव्हतं. मनातल्या शंका बाजूला सारत ती स्वयंपाकघरात गेली. ओट्यावर एक लिफाफा तिचं स्वागत करत उभा होता. घाबरतच तिने लिफाफा उघडला...

वास तिचा एकांताचा,
सुरुवात झाली या नाट्याला,
जेव्हा मिळाला लिफाफा पहिला!"

"नववा मजला त्या इमारतीचा,
वास तिचा एकांताचा,
सुरुवात झाली या नाट्याला,
जेव्हा मिळाला लिफाफा पहिला!"

त्या शब्दांनी कुणाचा तरी थंड हात तिच्या मानेवर फिरला आणि तिच्या अंगावर सर्रकन् काटा आला. घाबरून ती मागे वळली. तो तिच्यामा गेच सुऱ्यासकट उभा होता..

# ऐकलंस का रे कृष्णा?

**मितवा मुक्ता अनीश**

**बारावी, कला शाखा**

काय सांगू तुला कान्हा माझी ही कहाणी
तुला कान्हा म्हणण्याचाही मला अधिकार नाही

सत्यभामा, कालिंदी या माझ्याच बहिणी
कळले का कृष्णा, मी आहे तुझी रुक्मिणी

आली का रे ऐकू तुला कधी माझ्या मनाची गाज
चल रे कृष्णा, मनातलं थोडं तरी बोलू आज

का नाही माझ्या पदरी तुला जिंकल्याचे सुख
तुझे-माझे अल्लड प्रेम होती का रे माझी चूक

नव्हते ठाऊक मला कोण आहे ही राधिका
नाहीतर मीही नसते का झाले तुझी प्रेमिका

धर्मपत्नी मी तुझी, मी तुझी अर्धांगिनी
तरीही असते राधिका सदैव तुझ्या मनी

# मित्रा...

**समीहा सबनीस**

**प्रथम वर्ष, कला शाखा**

आपण फक्त मित्र आहोत
आणि तसा आपल्यात करार आहे
तरी आजन्म सोबत चालण्याचा
खुळा आपला ठराव आहे...

या उन्हाळयात आपण मिळून
सारं स्वच्छ, लख्ख केलं
उरलेल्या शंका अन् प्रश्न सारे
वाऱ्यासोबत उधळून दिले...

तरी फार काही बदललंच नाही
आपले हात थोडे सैल झाले
ते किती घट्ट धरायचे यावर काही
अवघडलेले नियम आले...

पण मित्रा, पावसानं अचानक येऊन
पुन्हा सारं धुरकट केलं
तुझ्याकडे छत्री नव्हती
अन् माझंही अवसान गळून पडलं...

एकाच छत्रीतून चालताना
आपण कोणता खेळ खेळत होतो?
पाऊस सोडून आपण अगदी
सगळ्या विषयांवर बोलत होतो...

पाऊस चिंब होता म्हणून
नाहीतर पुन्हा मन फसलं असतं
माझ्या चेहऱ्यावरचं वादळही मग
इतक्या सहज लपलं नसतं...

तरी मला तुझ्या माझ्या या
खेळाचं खूप कौतुक वाटतं,
तुझ्या दिखाव्याचं अन् माझ्या संयमाचं
खरंच खूप अप्रूप वाटतं...

तेव्हा पाऊस बिचारा छत्रीच्या कडेनं
आपल्याला अर्धामुर्धा भिजवत होता
उन्हाळयाच्या भेगा आपल्यातल्या
त्याच्या ओलाव्याने बुजवत होता...

पण तेवढ्याशा त्या ओलाव्याला
आपलं मन चिंब करणं झेपलंच नाही
उगाच आपलं आपल्या दोघांत
क्षणभर शहारून गेलं काहीबाही...

चिंब पावसात एका छत्रीतून
आपण गप्पा मारत चाललो होतो
तेव्हाही अगदी जाणूनबुजून
पावसाचा विषय टाळत होतो...

पण तरीही,
आपण फक्त मित्रच आहोत
कारण तसा आपल्यात करार आहे,
फक्त इतकंच, की आपल्या वाटेत
एक पावसाचं न उलगडलेलं गाव आहे...

# अविस्मरणीय भेट

## फादर टेरेन्स क्वॉड्रस

समुपदेशक

ते महंत मला जंगलाच्या सरहद्दीवर भेटले आणि मला अवघडलेल्या अवस्थेत पाहून त्यांनी मला जंगलात न जाण्याचं कारण विचारलं. “मला भीती वाटतेय… शहर सोडून जाण्याची. मी घाबरतोय कारण मला ते शहर ओळखीचं होतं; पण मला या जंगलाबद्दल काहीच माहीत नाहीये. मला या घनदाट जंगलातील मिट्ट काळोखाची भीती वाटतेय. मला ना या रानातील रस्ते ठाऊक आहेत, ना ते कुठे संपतात हे माहीत आहे. एकीकडे जंगलात संचार करणाऱ्या प्राण्यांच्या आवाजाची भीती वाटतेय, तर दुसरीकडे इथल्या भयाण शांततेची. मी इथल्या रानटी श्वापदांबद्दलही बरंच काही ऐकून आहे.” मी म्हणालो. “आधी मला सांग, तुला शहर नक्की सोडावसं वाटतंय का?” त्यांनी विचारलं. “मला कंटाळा आलाय त्या शहराचा. खूप वर्षं काढली मी तिथल्या माणसांसोबत आणि कर्णकर्कश्श आवाजांसोबत. तिथल्या सगळ्या रंगीबेरंगी आणि झगमगणाऱ्या गोष्टी पाहिल्यात मी. पण त्या चकचकणाऱ्या दुनियेत मला एकटेपणाशिवाय काहीच मिळालं नाही. हो, मला जगण्यासाठी ज्या गोष्टी हव्या आहेत त्या शहरातच मिळतील, हे मला माहीत आहे. तरीही मला स्वतःला त्या शहराच्या बाहेर पडायचंय. पण ते करायला काही केल्या माझा धीर एकवटत नाहीये!” मी उत्तरलो.

“चल माझ्यासोबत!” तो महापुरुष उद्गारला. आम्ही दोघेही त्या शहरात परत गेलो. अचानक दुःखाने मला आपल्या कवेत घेतलं. कदाचित पुढच्या घटनांचा आलेख मी आधीच मनात तयार केलेला. पण त्या सत्पुरुषाने माझ्याकडे पाहून मंद स्मित केलं आणि सगळं दुःख हवेत विरून गेलं. आम्ही शहरात शिरलो. प्रत्येक रस्त्यावर मला कितीतरी ओळखीची माणसं भेटत होती… मित्रमैत्रिणी , सहकारी आणि असे अनेक जण- ज्यांच्यावर मी मनापासून प्रेम करत होतो. मी त्या सगळयांची ओळख त्या साधूशी करून दिली. “आपण त्यांनाही जंगलात नेऊ या का?” मी अगतिकपणे त्या महापुरुषाला विचारलं. “जर तू त्यांनाही आपल्यासोबत घेतलंस, तर जंगलाची दुरवस्था होईल. त्यामुळे त्यांना न नेलेलंच बरं!”- इति महापुरुष.

दुःखाने मला पुन्हा घेरलं. पण त्या सत्पुरुषाने स्मितहास्य केलं आणि माझं दुःख परत एकदा नाहीसं झालं. मी त्यांना माझ्या घरातील मला आवडणाऱ्या आणि माझ्यासाठी अनमोल असलेल्या गोष्टी दाखवण्यासाठी नेलं. त्यांनी घरात प्रवेश केला अन् माझ्या बेडवर बसून म्हणाले, “बघू यातल्या तुला आवडणाऱ्या गोष्टी!” मी माझं

लिखाण, जमा केलेली पोस्टर्स, कल्पकता वापरून तयार केलेली रंगीबेरंगी कार्डस् आणि पत्रं मोठ्या अभिमानाने त्यांना दाखवली. “मी हे माझ्यासोबत नेऊ शकतो का त्या जंगलामध्ये?” मी भोळेपणाने विचारलं.

“या सगळ्या गोष्टींची ताबडतोब विल्हेवाट लाव!” महंत म्हणाले.

“पण या गोष्टी माझा जीव की प्राण आहेत. त्यांची विल्हेवाट मी कशी लावू?”- इति मी.

“तुला त्यांची काहीही गरज नाहीये. ते आधीपासूनच तुझ्या आत्म्याचा अविभाज्य भाग बनले आहेत. त्यांच्यापासून वेगळं होणं तुझ्याकरिता केवळ अशक्य आहे. त्यामुळे निःशंकपणे त्यांची विल्हेवाट लाव.” मी नम्रपणे ते जसं सांगतील तसं वागलो आणि माझ्या सगळ्या अमूल्य वस्तूंचा कायमचा निरोप घेतला... माझे आवडते फोटो, चित्रं, पत्रं, मी रचलेल्या त्या हृदयस्पर्शी कविता... माझ्या प्राणप्रिय वस्तूंचे ते भग्नावशेष पाहून मी मटकन् खाली बसलो आणि ओक्साबोक्शी रडू लागलो. त्या साधूने तोंडातून एक चकारही काढला नाही. त्यांनी माझं रडणं थांबण्याची वाट पाहिली. माझं रडणं थांबलं आणि मी त्यांच्याकडे वर मान करून पाहिलं. समजुतीचे दोन शब्दही त्यांच्या मुखातून बाहेर पडले नसले तरी त्यांचे डोळे फारच बोलके होते. दिसलं नसलं तरी आतल्या आत त्यांचंही रडून झालं होतं. “चल, निघू या आता!” ते म्हणाले. आम्ही घराबाहेर पडलो आणि थेट जंगलाची वाट धरली. कसं कोण जाणे, पण मला माझ्या अंगात बळ आल्यासारखं वाटू लागलं होतं. माझी भीडही चेपली गेली होती. आम्ही आता परत जंगलाच्या सरहद्दीवर उभे होतो.

“तुला या जंगलात जायची अजूनही इच्छा आहे?” त्यांनी विचारलं.

“मला अजूनही तिथे जायची भीती वाटतेय. पण तेवढीच इच्छाही वाढतेय. मला काहीच कळेनासं झालंय!”, मी उत्तरलो. “तुला आधी या झाडांशी मैत्री करावी लागेल. इथे ये आणि या झाडाला मिठी मार. बघ, किती आवाज ऐकू येतील तुला.”

मी झाडाला कवेत घेताच तो महापुरुष पुढे म्हणाला, “मी उद्या तुला घ्यायला येईन. तोपर्यंत इथेच थांब...” अंधार पडायला सुरुवात झाली होती. पण तो सत्पुरुष कशाचीही पर्वा न करता त्या घनदाट जंगलात निघून गेला. आणि मी मात्र त्या सरहद्दीजवळच्या पहिल्या झाडाला मिठी मारून उभा होतो. जंगलातून येणारे निरनिराळे सुवास आणि आवाज त्या मंतरलेल्या शांत, नीरव रात्रीत मी अनुभवत होतो. मी माझा गाल हलकेच झाडाच्या खडबडीत बुंध्याला लावला आणि त्या एका स्पर्शात जणू मी सारी ऋतुचक्रं अनुभवली. इतक्यात झाडाची एक फांदी मला हळूच स्पर्श करून गेली आणि तिने माझं सगळं भय एका फटक्यात घालवलं. रात्रभर ते झाड माझ्याशी विविध माध्यमांतून संवाद साधत होतं... ते त्याच्या बीजाविषयी, मुळांविषयी, जंगलातील पशुपक्ष्यांविषयी, तर कधी त्या जंगलात यापूर्वी येऊन गेलेल्या वाटाड्यांबद्दल सांगू लागलं. जसजशी रात्र सरू लागली, तसतसं माझ्या अंगात बळ संचारू लागलं. पहिल्या सूर्यकिरणांसोबत ते साधूपुरुष जंगलाबाहेर येताना दिसले आणि म्हणाले, “चल, आपल्याला अजून खूप दूर जायचंय.”

“माझी भीती आता बऱ्यापैकी कमी झाली असली

तरी मला अजूनही जंगलातील पाऊलवाटा दिसत नाहीयेत."- इति मी. "तू फक्त डोळे बंद कर आणि माझ्या मागोमाग ये. तुझं पाऊल जिथे पडेल तिथे वाट आपोआपच तयार होईल."

"माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे" मी म्हणालो आणि त्यांच्यामागोमाग जाण्याची तयारी करू लागलो. "तुझा तुझ्यावर विश्वास असला तरी पुरेसा आहे, मुला! आता पटकन् डोळे मीट आणि माझ्यासह चल!" ते उत्तरले. माझी भीती पळून गेल्याचं मी जरी कबूल केलं असलं तरीही मी ते छातीठोकपणे सांगू शकत नव्हतो. त्यामुळे दबकत दबकत का होईना, डोळे मिटलेले असतानाही त्यांच्यामागे जात राहिलो. माझ्या पायाखालची जमीन फारच मृदू आणि मुलायम भासू लागली. आणि खरंच, मी जिथे पाऊल ठेवेन तिथे मला नव्याने वाट सापडत होती. हळूहळू माझा आत्मविश्वास वाढत गेला आणि मी डोळे मिटूनच फिरत राहिलो. मी जवळपास एक संपूर्ण आठवडा त्या जंगलात चालत, धावत आणि बागडत काढला. इतक्या कमी काळात मी झाडांशी, पशुपक्ष्यांशी संवाद साधायला शिकलो. इतकंच नव्हे तर सावली आणि अंधाराशीही मी गट्टी केली. मी जणू त्या रानाशी एकरूप झालो होतो. तो आठवडा संपता संपता मला त्या साधूने हाताला स्पर्श केला आणि सांगितले, "बाळ, डोळे उघड!"

मी डोळे उघडून पाहिले तर नुकतीच सूर्याची कोवळी किरणं झाडांमधून डोकावून पाहत होती आणि आम्ही त्या वनाच्या हद्दीपाशी उभे होतो.

"आता थेट शहरात जा!" साधू म्हणाले.

"शहरात? पण तिथे तर माझं काहीच उरलं नाहीये. तुम्हीच मला सगळ्या गोष्टींची विल्हेवाट लावायला सांगितली. विसरलात?"- इति मी.

"तू जेव्हा शहरात जाशील तेव्हा सगळं काही पूर्ववत असेल. अरे, बदल फक्त तुझ्यामध्ये झालाय. तू या जंगलात फिरून आला आहेस. तू काही आता पूर्वीसारखा राहिलेला नाहीस."

मी मंद स्मित केलं आणि शहराच्या दिशेने कृतज्ञतेनं पावलं टाकू लागलो. एक नवीन दिवस नुकताच सुरू होत होता…

मला खात्री आहे, की आपल्या सगळयांनाच अशा प्रकारचे निरनिराळे अनुभव आले असतील आणि यापुढच्या जीवनातही येत राहतील. अनेकदा अशा अशक्यतांनी आणि समस्यांनी भरलेल्या जंगलात जाणं आपल्या सगळयांनाच सुरुवातीला भीतीदायक वाटू शकतं, पण या अनुभवांतूनच आपण कित्येक गोष्टी शिकत जातो. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आपण कोणाचंही अंधानुकरण न करता घडत आणि खऱ्या अर्थाने वाढत जातो.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# दयामरण

प्रा. अदिती सावंत
अर्थशास्त्र विभागप्रमुख

एके दिवशी मी आणि माझी मुलगी तनू काही कामानिमित्त बाहेर पडलो. आम्हाला सीएसटीला जायचं होतं. दुपारचे १२ वाजले होते. रस्त्यावर रिक्षाला हात दाखवला, तितक्यात एक कुत्रा आपल्या शरीराचा मागचा भाग घासत घासत जाताना दिसला. जवळ जाऊन बघितलं तर त्याच्या शरीराचा मागचा भाग जखमी झालेला होता. त्याच्यावरून कदाचित गाडी गेली असावी. त्याचे डोळे पूर्ण निस्तेज झाले होते. मी तिथे जमलेल्या मुलांना विचारलं, “अरे, हा किती दिवसांपासून अशा अवस्थेत आहे?” पण कोणालाच धड काही सांगता येईना. तितक्यात कोणीतरी मला वरच्या मजल्याच्या गॅलरीतून हाक मारली आणि म्हणाले, “प्राण्यांच्या डॉक्टरांना फोन करा.” हे ऐकता एक मुलगा त्यांच्या बिल्डिंगमध्ये ज्यांच्याकडे पाळीव कुत्रा आहे त्यांच्याकडे पळाला. मी पण इंटरनेटवर डॉक्टरांचा नंबर सापडतो का पाहिलं आणि मला एका जवळच्या डॉक्टरचा नंबर सापडला. तितक्यात तो मुलगाही डॉक्टरचा नंबर घेऊन आला. त्या डॉक्टरांना फोन केला. डॉक्टर म्हणाली, “मी स्वतः येऊ शकत नाही. तुम्ही कुत्र्याला घेऊन या.”

हे सगळं होईपर्यंत तो कुत्रा आपलं अंग घासत घासत आमच्या बिल्डिंगपर्यंत गेला. त्याला चपाती दिली. पण तो खाईना. बघितलं तर त्याचे बहुतेक दात पडले होते. मग त्याला आम्ही पाणी पाजलं. तो घटाघट दोन तांबे पाणी प्यायला. याचा अर्थ कितीतरी दिवसांपासून त्याला पाणी प्यायला मिळालं नव्हतं. आता प्रश्न असा होता, की याला डॉक्टरकडे कसं घेऊन जायचं? त्याचा मागचा भाग पूर्ण जखमी झालेला. आणि तो कधीही कोलमडून पडेल अशा अवस्थेत होता. डोळे तर पूर्ण घाणीने भरले होते. मी कुठून तरी एक गोणपाट आणलं. पण त्यात त्याला भरायचं कसं? तितक्यात माझ्या मुलीने घरात जाऊन आजीचं एक जुनं कापड आणलं. ते त्याच्या पोटावर टाकलं आणि त्याच्या कमरेत हात घालून त्याला मी कडेवर उचललं. मी त्याला वर उचलताक्षणीच त्याची लघवी माझ्या पायावर घरंगळत गेली. मला क्षणभर काय करावं तेच समजेना. तितक्या त कोणीतरी रिक्षा बोलावून आणली. आम्ही रिक्षात खाली गोणपाट टाकलं आणि त्यावर त्याला उचलून ठेवलं. सोबत माझी मुलगी आणि शेजारचा दहा वर्षांचा मुलगा रिक्षात उडी टाकून आधीच बसले होते. आम्ही रिक्षा करून डॉक्टरकडे गेलो. मी क्लिनिकबाहेरच्या व्हरांड्यात त्या कुत्र्याला अलगद उचलून ठेवलं. पुन्हा एकदा त्याची लघवी माझ्या पायावरून ओघळली.

क्लिनिकसमोर तो अतिशय शांतपणे बसला होता. जणू काही डॉक्टरकडे आपण स्वतः हून आलो आहोत, ती आपल्याला तपासणार आहे, औषध देणार आहे असे भाव त्याच्या डोळ्यांत दिसत होते. आधीच्या दोन कुत्र्यांना तपासून झाल्यावर डॉक्टरने आम्हाला आत बोलावलं. तिने कुत्र्याला जमिनीवर ठेवायला सांगितलं. कुत्र्याची अवस्था बघितली आणि म्हणाली, “हा कुत्रा नाही, कुत्री आहे! तिच्या मागच्या बाजूवरून एखादं वाहन गेल्यामुळे किंवा जड वस्तू पडल्या मुळे शरीराचा अर्धा भाग पूर्ण चिरडला गेला आहे. पाठीचं हाडही तुटलंय. मलमूत्राचा मार्ग निकामी झालाय. ही कुत्री आता फार काळ जगणार नाही.”

मी म्हणाले, “डॉक्टर, मग आता काय करायचं?

डॉक्टर म्हणाली, “तिला दयामरण द्या. त्याशिवाय सद्य:स्थितीत दुसरा पर्याय नाहीये. पण तुम्ही हिची नंतर विल्हेवाट कशी लावणार? कळलं तर महानगरपालिका ऑब्जेक्शन घेईल.”

“मग काय करावं आम्ही?” मी विचारलं.

“मुलुंडमध्ये एक कुत्र्यांसाठीची सेवाभावी संस्था आहे. तिथे घेऊन जा. ते ठरवतील तिचं काय करायचे ते.” - इति डॉक्टर.

मुलुंडमध्ये कुत्र्यांसाठी सेवाभावी संस्था आहे याची मला कल्पना नव्हती. आम्ही डॉक्टरकडून त्या एनजीओचा पत्ता घेतला आणि परत एकदा रिक्षा करून एनजीओच्या दिशेने निघालो. तिथे पोहोचल्यावर तिथल्या क्लार्कने डॉक्टरला बोलावून घेतलं आणि दोन वॉर्डबॉयज् त्या कुत्रीला उचलून आत घेऊन गेले. तोपर्यंत क्लार्कने माझ्याकडून एक फॉर्म भरून घेतला. आम्हा सर्वांना तिथे असलेलं sterlization centre आतून बघण्याची इच्छा झाली. परंतु आत गेल्यावर जाणवलं, की ती जागा गुदमरून टाकणाऱ्या वासाने भरलेली आहे. नाकावर रुमाल दाबत आम्ही कसेबसे आत गेलो तर एकापेक्षा एक भयंकर कुत्रे अंगावर भुंकायला लागले. पण बहुतेक कुत्रे पिंजऱ्यात कोंडलेले होते, पण एक अजस्त्र कुत्रा मोकळेपणाने त्या खोलीत हिंडत होता. ते दृश्य पाहताच माझ्या तोंडचं पाणी पळालं होतं. पायाखालची जमीन सरकली होती. मी असं दृश्य कधीच पाहिलं नव्हतं. बंद पिंजऱ्यातले इतके कुत्रे! कुणी पिसाळलेले, कुणी जखमी, कुणी रक्ताने माखलेले, कुणी शक्तीहीन, कुणी निस्तेज... त्या डॉक्टरने मला मी आणलेल्या कुत्र्याकडे नेलं. ‘केनेल नंबर २२८’ त्याने बोट करून दाखवलं. त्याच्यावर माझ्या नावाचा कागदी बिल्लासुद्धा लावलेला होता. मी त्या कुत्रीला निरखून बघितलं आणि डॉक्टरला विचारलं, “तुम्ही या कुत्र्यांच्या स्वास्थ्यासाठी काय करता?”

“आम्ही त्यांना रोज अंघोळ घालतो. जेऊ घालतो. गरज असल्यास औषधं देतो. तुम्हाला वाटल्या स तुम्ही रोज येऊन हिला बघू शकता.”

आम्ही तिथून निघालो. दुपारचे दोन वाजले होते. नंतरचे चार दिवस मला काही कारणास्तव त्या एन.जी.ओ.मध्ये जायला वेळच मिळाला नाही.

पाचव्या दिवशी- शुक्रवारी मी आणि तनू वेळ काढून त्या संस्थेत गेलो. त्यांना सांगितलं, ‘केनेल नंबर २२८’च्या कुत्रीला भेटायचंय. यावेळी मी मनाची तयारी करून गेले होते. पण तरीही त्या खोलीत शिरल्या शिरल्या थरकाप उडालाच. कुत्री त्याच अवस्थेत होती. समोर डाळ-भाताचं भांडं होतं, पण त्याला तिनं शिवलंसुद्धा नव्हतं. मी तिच्या डोळ्यांत पाहिलं अन् तिने माझ्या... काही बोलण्यासारखं नव्हतंच. तिने मला ओळखलं की नाही, कोणास ठाऊक! माझ्या तोंडावर रुमाल होता. आम्ही बाहेर आलो. मला तिच्यात काहीच फरक जाणवला नाही.

“किती दिवस अशा अवस्थेत राहणार ती?” मी तिथल्या मदतनीसांना विचारलं.

“माहीत नाही.”

“तुमच्याकडे येण्याअगोदर आम्ही एका डॉक्टरकडे गेलो होतो, तिने आम्हाला दयामरणाचा पर्याय सुचवला होता.”

“दयामरण? छे छे! काय बोलताय हे तुम्ही? आमच्याकडे आम्ही तिला मरेपर्यंत बघू.”

त्यांच्या उत्तराने निश्चिंत होऊन मी घराकडे निघाले. त्याच रात्री १०.३० वाजता एन.जी.ओ.मधून फोन आला- “ ‘केनेल नंबर २२८’ची कुत्री गेली.”

“अहो, पण मी आज दुपारी ४.३० वाजताच तर येऊन गेले होते.”

“तुम्हाला हवं असल्यास तुम्ही येऊ शकता. नाहीतर आम्ही तिला उद्या कोरा केंद्रातील इलेक्ट्रिक पेटीमध्ये दहन करणार आहोत.”

मी, माझे यजमान आणि दोन्ही मुलं रात्री ११.१५ वाजता त्या एन.जी.ओ.मध्ये पोहोचलो. आत गेलो आणि पुन्हा तेच केविलवाणं दृश्य अनुभवायला मिळालं. पण आता त्या सगळ्याची थोडी सवय झाली होती. आणि तो दुर्गंधसुद्धा बऱ्यापैकी सहन करता येत होता. तिथल्या मदतनीसांनी गोणपाटात गुंडाळलेला तिचा मृतदेह बाहेर काढला. आम्ही तिच्या तोंडात पाणी सोडलं आणि तिच्यासा ठी प्रार्थना केली. बाहेर आल्यावर त्या संस्थेला दोन हजार रुपयांचा चेक दिला. पण माझ्या मनात मात्र ती खरोखर मेली की तिला दयामरण दिलं गेलं, हा विचार कितीतरी दिवस सतावत राहिला. पण काहीही झालं तरी मी तिला परत भेटायला येईपर्यंत तिने श्वास रोखून धरला होता, यातच मला सारं काही मिळालं होतं.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# प्राचार्य ॲगींशी गप्पाटप्पा

कॉलेजमध्ये सर्वांवर दरारा असलेल्या आणि प्रामुख्याने अर्थशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रिय असलेल्या प्राचार्य डॉ. ॲग्नेलो मिनेझिस यांच्याशी मनमोकळा संवाद साधण्याचा आम्हाला योग आला. बाहेरून कितीही कठोर वाटत असले तरी आतून मनाने अत्यंत निर्मळ असलेल्या आणि सर्वसामान्यांप्रमाणे जीवन जगणाऱ्या विद्यार्थीप्रिय प्रोफेसर ॲगींसोबत केलेल्या हलक्याफुलक्या गप्पा...

**नमस्कार! तुमच्यासारखे हाडाचे शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनावर जी छाप पाडतात ती अगदी जीवनभर लक्षात राहते, असं अनेक जण म्हणतात. कॉलेजजीवनातील तुमचे आवडते शिक्षक कोण होते?**

मी कुमारवयात असताना बरीच पुस्तकं वाचायचो. इतर समवयस्कांप्रमाणे मीही त्या काळात अनेक काल्पनिक कथा आणि अगदी शरीरसुखाबद्दलची पुस्तकही धडाधड वाचून काढली. पण झेविअर्समध्ये आल्यावर माझ्या इंग्रजीच्या एका शिक्षिकेनं- डॉ. युनिस डिसुझा यांनी मला लेक्चर रूम '२० जी'मध्ये बोलावून घेतलं. माझा पुस्तकांकडील ओढा पाहून त्यांनी मला इंग्रजी साहित्याचं भांडार खुलं करून दिलं. आपण किती बिनकामाच्या गोष्टी वाचत होतो, हे मला तेव्हा कळलं. त्या शिक्षिकेने मला केवळ वाचनाचीच नाही, तर लिखाणाचीही आवड लावली. मी प्रत्येक पुस्तक वाचल्यावर त्या मला त्या पुस्तकाशी निगडित किंवा इतर कोणत्याही गोष्टीवर दहा वाक्यं लिहून आणायला सांगायच्या. नंतर नंतर हा सराव त्यांनी मला रोज करायला सांगितला. पण मग काही काळानंतर मला काही सुचेना. हळूहळू मला हा सराव नित्यनेमाने करण्याचा कंटाळाही येऊ लागला. त्यामुळे मी या सरावापासून सुटकारा मिळवण्यासाठी त्यांच्यापाशी गेलो. मला वाटलं माझी या अवघड गोष्टीतून सुटका होईल, पण कसलं काय! त्यांनी मला पूर्णविरामावर दहा ओळी लिहून आण, असं सांगितलं. आता त्या एका छोट्याशा बिंदूबद्दल एवढं काय लिहायचं? पण क्षुल्लकातील क्षुल्लक गोष्टींवर विचार करून लिहिण्याची कला मला तेव्हा अवगत झाली. आसपासच्या लहानसहान गोष्टींबद्दल मी बारकाईने विचार करू लागलो. हळूहळू विचारांत प्रगल्भता यायला लागली. भाषा सुधारली, वाणी सुधारली, व्याकरण सुधारलं. आणि मुख्य म्हणजे शब्दसंपदा वाढली. याचा फायदा मला पुढे अभ्यासात आणि प्रकल्प करण्यासाठी झाला.

**झेविअर्समध्ये विद्यार्थी असल्यापासून प्राचार्य होण्यापर्यंतचा प्रवास कसा होता?**

मी परळच्या एका गरीब घरात वाढलो. माझी शाळा फार काही खास नव्हती. पुढे झेविअर्समध्ये प्रवेश घेतल्यावर मी इथल्या 'स्टुडंट कल्चर'मुळे खूप

काळ भांबावून गेलो होतो. इथे येणाऱ्या मंडळींशी मला कधीच सहजतेने जुळवून घेता आलं नाही. त्यावेळी मला कोणीही जीवाभावाचे मित्र नव्हते. मी कॉलेजमध्ये दिवसभर एकटाच फिरायचो. कधी कधी लेक्चरला बसायलाही कंटाळा येऊ लागला होता. माझी उपस्थिती पुरेशी नसल्याने माझं नाव एक वर्ष ब्लॅक लिस्टमध्येही आलं होतं. मी वर्गात नेहमी खिडकीजवळच्या बाकावर बसत असे. लेक्चरचा कंटाळा आला की हळूच खिडकीबाहेरचा निसर्ग न्याहाळायचो. असे कित्येक दिवस खिडकीबाहेर मन गुंगवण्यात गेले. वर्गात शिकवलेल्या गोष्टींकडे थोडं दुर्लक्ष व्हायला लागलं. त्यामुळेच मला स्वतःचा अभ्यास स्वतःच करण्याची सवय लागली. मी ग्रंथालयात खूप वेळ बसू लागलो. माझी वाचनाची आवड त्यावेळचे ग्रंथपाल डॉमनिक फर्नांडिस यांच्या लक्षात आली आणि एके दिवशी त्यांनी मला अर्थशास्त्राचा शब्दकोश चाळायला सांगितलं. त्यावेळी त्यातले काही शब्द माझ्या डोक्यावरून गेले. पण तेव्हा झालेली ती शब्दओळख मला आजही कामी येते. एके दिवशी आम्हाला अर्थशास्त्र शिकवणारे प्राध्यापक आले नव्हते. मी कुठून तरी चोरलेले खडू घेतले आणि माझ्या वर्गमित्रांना अर्थशास्त्र शिकवू लागलो. कदाचित मी बरं शिकवलं असेन, कारण सगळेच लक्षपूर्वक माझं बोलणं ऐकत होते. ही घटना त्यावेळच्या प्राचार्यांनी पाहिली आणि ते माझ्यावर थोडेसे खेकसले. पण त्यांनी मला वर्गाच्या बाहेर मात्र काढलं नाही. पुढे मला झेविअर्सच्या कनिष्ठ महाविद्यालयात शिकवण्याची संधी मिळाली आणि मी त्या संधीचा पुरेपूर लाभ घेतला. प्राध्यापक ते प्राचार्य हा प्रवास मात्र मला खूपच त्रासदायक वाटला. मी प्राध्यापक असताना काहीही घातलं तर त्याकडे कोणाचं लक्ष जायचं नाही. आणि गेलं, तरीही त्याचा कसलाही बाऊ केला जात नव्हता. पण प्राचार्य झाल्यावर मला पूर्वीसारखे इस्त्री न केलेले कपडे आणि माझ्या आवडत्या स्वस्तातल्या चपला घालता येत नाहीत. आता मीटिंग्जना टापटीपच जावं लागतं. सगळयांच्या नजरा माझ्याकडे रोखलेल्या असतात. एकदा मला या सगळया टापटीपपणाचा कंटाळा आला होता. म्हणून मी पदवीदान समारंभाला खास कपडे घालून गेलोच नाही. मला मवाळ भाषेत विचार व्यक्त करता येत नाहीत. पण प्राचार्य झाल्यापासून माझ्या परखड भाषेला लगाम घालण्याचा प्रयत्न करतोय. दोन वर्षांपूर्वी प्रवेशप्रक्रियेदरम्यान मी कँटीनमध्ये काहीतरी खात होतो. अचानक माझ्यासमोर एक पालक आले आणि त्यांनी मी सगळयांसोबत एवढ्या गर्दीत कँटीनमध्ये बसून का खातोय, असं विचारलं. लोकांच्या प्राचार्यबद्दलच्या अपेक्षा खूप वेगळया असतात हे मला तेव्हा कळलं. मला वाटतं, माझ्यासाठी प्राचार्यपदाची नव्याची नवलाई आता संपली आहे. मला आता झेविअर्समध्ये बदल घडवण्यावर लक्ष केंद्रित करायचंय.

**तुम्ही खूप छान मराठी बोलता हे आम्हाला कळलं आहे. तुमची मराठीशी नाळ कशी जोडली गेली?**

माझा जन्म परळमध्ये झाला. तिथे शिवसेनेचं अधिराज्य होतं. आसपास बरेचसे मराठी शेजारी होते. त्यात अनेक कामगारांची मुलंसुद्धा होती. तेव्हा मी रात्रीच्या कॉलेजमध्ये या मुलांना

शिकवायला जायचो. त्यांची आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिती मला माहीत होती. मला एक उत्तम शिक्षक व्हायचं होतं. त्यामुळे या मुलांना इंग्रजी येत नाही हे कळताच मी तोडक्यामोडक्या हिंदी आणि मराठीत त्यांना शिकवायला सुरुवात केली. पुढे कॉलेजात मला जेव्हा वाचनाची गोडी लागली, तेव्हा मी पु. ल. देशपांडेंचं एक पुस्तक वाचलं होतं. नंतर जेझ्वीट होण्याचं शिक्षण घेताना 'शांतता कोर्ट चालू आहे', 'तो मी नव्हेच' ही नाटकंही पाहिली. मराठी साहित्य किती प्रगल्भ आहे आणि मराठी भाषेत गोष्टी किती अचूक शब्दांत मांडता येतात याची तेव्हा प्रचीती आली. प्राध्यापक झाल्यावर मराठी सहकाऱ्यांशी बोलताना आणि त्यांचं बोलणं ऐकताना हळूहळू माझंही मराठी सुधारत गेलं.

**आवडता मराठी पदार्थ?**

मला कँटीनची व्यवस्था पाहायला सांगितली तर मी आपल्या कॉलेजमध्ये वरण-भातासारखे सात्विक पदार्थच उपलब्ध करून देईन. चमचमीत पदार्थांमध्ये मला उसळ आणि मिसळ फार आवडते. लहानपणी हलाखीची परिस्थिती असल्यामुळे कधीकाळी खायला मिळालीच तर मी भरपूर पाणी घातलेली मिसळ खायचो. चविष्ट नाही, पण पोट भरेल एवढी मिसळ खाल्ल्याचं समाधान काही औरच होतं!

**झेविअर्स सोडताना मागे वळून पाहताना काय दिसेल?**

मी इतक्या वर्षांनंतर मागे सोडलेला वारसा… इथल्या असंख्य आठवणी आणि त्या आठवणींशी निगडित माणसं…

**खेळ शब्दांचा…**

**झेविअर्स-** आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे.

**आनंद-** मनःशांती आणि दुसऱ्यांना भरघोस यश मिळवताना पाहणं.

**ॲगी-** नि:स्वार्थ वेडा!

**मराठी वाङ्मय मंडळ-** रहस्यमय संस्था.

**जीवनाचा मंत्र-** साधी राहणी आणि उच्च विचारसरणी.

**विद्यार्थी म्हणून झेविअर्समधील आवडती जागा-** लेक्चर रूम नंबर ४१. खरंतर तिथे मी कोणासमोर तरी मुद्दाम दिखाऊपणा करायला जायचो. बेल वाजली की दुसरे शिक्षक येण्याआधी खडू, डस्टर असा सगळा जामानिमा घेऊन मी समवयस्क विद्यार्थ्यांना काहीबाही शिकवण्याचा अभिनय करायचो. आता हा सगळा उद्योग कोणासाठी करायचो हे मात्र मी तुम्हाला सांगू शकणार नाही.

**प्राध्यापक म्हणून झेविअर्समधील आवडती जागा-** अर्थशास्त्र विभाग.

**प्राचार्य म्हणून झेविअर्समधील आवडती जागा-** संध्याकाळी हॉस्टेल रूम आणि रात्री प्राचार्य कक्ष. तुम्हाला खोटं वाटेल, पण कोणीही या व्हरांड्यात फिरत नसताना रात्रीच्या वेळी मी या खोलीत बसलो की लाकडी फरशीवर कोणाच्या तरी पावलांचे आवाज ऐकू येतात आणि माझ्या खोलीचे दरवाजे आपोआप उघडझाप करू लागतात.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# झेविअर्सपलीकडचं जग...

**अनुजा संसारे**

**उपसचिव २०१४-१५**

कॉलेजच्या फर्स्ट क्वॉडमध्ये पदवीदान समारंभ झाला तेव्हा माझ्या मनात दोन भावनांची घालमेल सुरु होती. एकीकडे कॉलेजमधून बाहेर पडून खरं जग अनुभवायला मिळणार याचा उत्साह, तर दुसरीकडे आयुष्यातली सगळ्यात महत्त्वाची वर्षं जिथे काढली ती जागा सोडण्याचं दुःख! आतापर्यंतचं आयुष्य कॉलेजमधल्या खूप सुरक्षित वातावरणात मस्ती आणि धमाल करण्यामध्येच गेलं होतं. पण यापुढचं आयुष्य एवढंच सुंदर, सुरक्षित आणि असंख्य माणसांशी, नव्या जागेशी वेगळं नातं जोडणारं असेल का, हा प्रश्न माझ्या मनामध्ये काहूर माजवत होता.

मी झेविअर्समध्ये २०१० साली आले. केवळ हे कॉलेजच नव्हे, तर मुंबई शहर देखील माझ्यासाठी नवं होतं. माझं आधीचं सगळं आयुष्य रत्नागिरी जिल्ह्यात गेलं होत. आल्या मी नवं शहर, नवं कॉलेज या सगळ्याने पुरती भांबावू न गेले होते. रत्नागिरीमधील एका छोट्या मराठी माध्यमाच्या शाळेमधून झेविअर्ससारख्या मोठ्या कॉलेजमध्ये यायचं या विचारानेच मी पार घाबरून गेले होते. नवे मित्रमैत्रिणी जोडणं, नवीन 'रुटीन'शी जुळवून घेणं खूपच अवघड वाटायला लागलं होतं. पण कालांतराने या सगळ्याला तोंड द्यायला कॉलेजनेच शिकवलं. पुढे कॉलेजमधील कार्यक्रमांतून, लेक्चर्समधून होणाऱ्या चर्चांमधून माझ्यात आत्मविश्वास वाढत गेला. माझ्या विचारांमध्ये, व्यक्तिमत्त्वामध्ये प्रगल्भता आली. या पाच वर्षांत मला कॉलेजने जणू भावी आयुष्यासाठी तयार केलं. कॉलेजनंतर मी मुंबई सोडून पुण्यात राहायला गेले. नवीन शहरात नव्याने आयुष्य सुरु करणं हे कायम आव्हानात्मक असतं. पुणे हे शहर मी आधी राहिलेल्या शहरांपेक्षा खूपच वेगळं होतं. आधीच ऐकिवात आल्यानुसार इथली माणसं पण जरा वेगळी होती. पुण्यातील कॉलेजमध्ये महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशांमधून आलेली अनेक मंडळी भेटली. कॉलेजमध्ये संपर्कात येणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारची व्यक्तिमत्त्व आणि निरनिराळी पार्श्वभूमी असलेल्या लोकांमुळे समाजात वावरताना अनोळखी माणसांना स्वतःच्या आयुष्यात सामावून घेता आलं. त्याबरोबरच तरुणपणातल्या निरनिराळ्या जबाबदाऱ्यांची देखील जाणीव झाली. 'अडल्टिंग' म्हणजे नेमकं काय, हे हळूहळू समजायला लागलं.

झेविअर्समध्ये मिळालेलं ज्ञान प्रत्यक्षात वापरण्याचे बरेच प्रसंग आले. त्यावेळी आपल्याकडे व्यावहारिक अनुभव कमी पडतो आहे याची नेहमी जाणीव व्हायची. कॉलेजमध्ये असणाऱ्या सुरक्षित वातावरणामुळे आपण कधीच गंभीर प्रश्नांची ‘खरी’ उत्तरं शोधण्याच्या भानगडीत पडत नाही. तेव्हा आपले ज्ञानाच्या जोरावर हुशारक्या मारण्याचे दिवस असतात. पण हेच ज्ञान कॉलेजबाहेरील खऱ्या जगाला सामोरं जाताना अनुभवांपुढे कमी पडतं. माझंही काहीसं असंच झालं. एकदा पुण्यात केळी विकत घ्यायला गेले असताना केळी विकणाऱ्या दादांची आणि आजूबाजूच्या लोकांची गुड्स अँण्ड सर्विसेस टॅक्स (जीएसटी) वर चर्चा सुरु होती. मी पण त्या चर्चेत सहभागी झाले आणि माझं ठाम मत मांडलं, की जीएसटी किती महत्वाचा आहे. मी जीएसटी वर बरेचसे लेख वाचले होते. त्याची अंमलबजावणी कशी करण्यात येणार आहे हेदेखील मी त्यांना सांगितलं. पण त्यांनी विचारलेल्या एका प्रश्नाने मात्र मला निरुत्तर केलं. जीएसटीमुळे सर्वसामान्य माणसांचं जीवन सुखकर होईल का, हा साधा- सोपा प्रश्न होता तो. सर्वसामान्य माणसं जीवन सुखकर करण्यासाठी काय खस्ता खातात याचा मला प्रत्यक्ष अनुभव नव्हता. त्यामुळे मला गप्प राहण्याशिवाय कुठलाच पर्याय उरला नाही. पण अशा अनुभवांतूनच बरंच काही शिकायला मिळालं ... मिळतंय. मी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करायला लागल्यामुळे विचारांचे, ज्ञानाचे नवीन दरवाजे माझ्यासाठी खुले झाले. पण या विचारांसाठी जो सर्वसमावेशक दृष्टिकोन लागतो तो मला झेविअर्सने दिला. कॉलेजमधील मुक्त

विचारांसाठी जो सर्वसमावेशक दृष्टिकोन लागतो तो मला झेविअर्सने दिला. कॉलेजमधील मुक्त वातावरणामुळे नव्या विचारसरणींचा अभ्यास न्यूनगंड न बाळगता करता आला. सर्वात महत्त्वाचं म्हणजे अपयशांना सामोर जावं लागलं. त्यातून बाहेर पडणं हे सगळ्यात मोठं आव्हान होतं. तरीही कॉलेजमध्ये आलेल्या काही अनुभवांतून माझी जीवननौका पुढे वल्हवत नेणं मला सुकर होतंय.

आपल्या कॉलेज अॅन्थममध्ये आपण म्हणतो, “Xavier’s you gave me roots and wings” - हे वाक्य किती खरं असू शकतं हे कॉलेज सोडल्याशिवाय समजत नाही. कदाचित तुम्हाला हे सगळं अतिशयोक्त वाटेल, पण तुम्हालाही कॉलेजनंतरच्या आयुष्यात याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# जीवनचित्र

**प्रा. सचिन हेगडे**

**इंग्रजी विभाग, कनिष्ठ महाविद्यालय**

तुम्ही आतापर्यंत केलेलं चांगलं कार्य जर चित्ररूपी
बनवायचं ठरवलं
अन् त्याला सोन्याची फ्रेम करायचं ठरवलं
तर ते चित्र आकाराने लहान असेल की मोठं?

तुमच्या चेहऱ्यावरच्या प्रत्येक निर्मळ
स्मितहास्याला
निळ्याभोर आकाशासारखं रंगवलं आणि
तुम्ही सांगितलेलं प्रत्येक असत्य जर काळे ढग
बनलं तर…?

तुम्ही इतरांना केलेल्या मदतीचं एकेक झाड बनलं
तर अशा किती झाडांनी ते चित्र व्यापून जाईल?
तुमच्या चांगुलपणाची सूर्यकिरणं बनली
तर तुमच्या कर्तृत्वाच्या चित्रात दिवसाएवढा उजेड
असेल?

की तुमच्या जीवनचित्रात निळ्याऐवजी गूढ काळे
ढग असतील?
आणि त्यात झाडांऐवजी त्यांच्या गडद सावल्या
असतील?

आनंदाच्या भिंतीवर टांगलेल्या या चित्राचा
आस्वाद
जगाला घ्यायचा असेल तर...?
प्रत्येक व्यक्तीने आपलं जीवनचित्र स्वतःच रंगवलं
पाहिजे!

**(अनुवादित)**

# बाबा

**हर्षद पारेकर**

**(माजी संपादक २०१५-१६)**

मायेचा पाझर असतो आईकडे
सुखाचा प्रेमळ स्पर्श आईकडे
प्रेमाने मारणारी मिठीही आईकडे
मग उरले तरी काय बाबांकडे?

सदैव भक्कम असणाऱ्या बाबांना
भय कधी वाटत नसेल?
डोळ्यांत अश्रू न दाखवणाऱ्या बाबांना
रडायला कधी येत नसेल?

कितीही कठोर असल्याचा देखावा
केलात जरी तुम्ही बाबा,
तरीही मायेचा प्रेमळ ओलावा
तुमच्या हृदयाशी बिलगून कळतो मला बाबा...!!

प्रेमाचा पेटारा उघडायला लाजतात
पण संकटसमयी माझे दैवत होतात!
‘इजा होऊ नये’ म्हणून जपतात
तरीही नाटक रागवण्याचे करतात!!

या नात्याचे तसे वेगळेच स्वरूप
प्रेम अन् जिव्हाळा यातला अनुप...
नाते असे हे न होणे अनंतात एकरूप
दीर्घायुष्य लाभो तुम्हांस तीर्थरूप...!!

# आभाळ आमचा संसार

## प्रा. अवकाश जाधव

**इतिहास विभाग**

निसर्ग हे दैवत आमचं, माय आमची माती
मानवी नकाशे मानत नाही, आम्ही भटक्या जमाती
दर्‍याखोर्‍यांशी मैत्री आमची, आम्ही निष्पाप मनाने जगतो
जगाच्या पाठीवर नवी पायवाट आम्ही कोरुनी काढतो

ब्रिटिश सरकारने अब्रू काढली,
आपलं सरकारही आम्हास पदरात घेत नाही
राजकीय स्वातंत्र्यात आमचं सामाजिक अवलोकन होत नाही
देवाची पोरं आम्ही, देव आम्हाला शापित नाही
या कायद्याच्या माजापाई समाजही आम्हाला जवळ करत नाही

चोर भामट्या आणि दरोडेखोर ही नावं दिली आम्हाला
जराही आमची कींव येत नाही का या समाजाला?
आमची स्वप्नं आम्हालाही रंगवायची आहेत
गोरगरीब का असू ना, मुलांना चांगलं भविष्य द्यायचं आहे

एक झोळी संसार आमचा, उद्याच्या दाण्याचा पत्ता नाही
या निर्लज्ज आयुष्यात रडायची पण सोय नाही
देवाची पोरं आम्ही, मग कोणी मांडल्या या जाती
आम्हाला मागे सारून, होईल का तुमची देशोन्नती?
एक ओंजळ पाण्याचं आयुष्य, नका करू आमचा तिरस्कार
पाखरांसारखी भरारी आमची, आभाळ आमचा संसार

**(समस्त फासे पारधी समाज आणि भटक्या जमातींना समर्पित)**

# जीवनमंत्र

## दिनेश मोहिते

**टेक्निशियन**

आयुष्य खूप सुंदर आहे
ते आनंदाने फुलवत राहा…

जीवन खूप विनोदी आहे
त्यामुळे सर्वांना हसवत राहा...

जीवनात असतील अनेक अडचणी
तरी त्यांच्यावर मात करत राहा…

नकारात्मक विचार भरपूर येतील मनात
पण सतत सकारात्मक विचार करत राहा…

आपल्याला आयुष्यात कित्येक चांगली कामं
करायची आहेत
या विचाराने नेहमी प्रेरित राहा…

